IRBK-0108990

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय [illegible]
ग्रा. क्र. ....... नों. दि. .......
वि. .......

# शिव-सती

लेखक
पु. रा. बेहेरे

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ..........
विभाग ..........
क्रमांक ..........
नों. दि. ..........
वाचनालय

श्री विजय प्रकाशन

श्री विजय प्रकाशन, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ६०.

किंमत सव्वा रुपया

प्रकाशिका
सौ. मनोरमा पुरुषोत्तम बेहेरे
रामेश्वर निवास,
जोगेश्वरी ( पूर्व ) मुंबई ६०

मुखपृष्ठ
श्री. दीनानाथ दलाल

चित्रें
श्री. परब

मुद्रक
शं. त्र्यं. आवटे,
इंदिरा प्रिंटिंग प्रेस,
१००५ सदाशिव,
पेरुगेटनजीक, पुणें २

प्रकाशन
महाशिवरात्री शके १८८२
१३ फेब्रुवारी, १९६१

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | शिवशक्ति | ७ |
| २ | कलहाचा प्रारंभ | ९ |
| ३ | द्वेष भडकला | १७ |
| ४ | सती बिथरली | २४ |
| ५ | सतीची मिरवणूक | २९ |
| ६ | सती गेली | ३[illegible] |
| ७ | शिवगणांचा पराभव | ४[illegible] |
| ८ | शिवाचा क्रोध : वीरभद्र | ४३ |
| ९ | दक्षयज्ञ विध्वंस | ४८ |
| १० | शंकराची प्रार्थना | ५४ |
| ११ | शिवाची भ्रमणयात्रा | ६० |
| १२ | शिव-समाधि | ६४ |

# परमहंस श्रीनित्यानंद स्वामी



IRBK-0108990

IRBK-0108990

—श्री. मणिलाल एन्. पंड्या, नागछाप हिंगवाले यांच्या सौजन्यानें.

## परीक्षा अभ्यासवर्ग

* F. Y. Arts & Science : English & Mathematics.
* एस्. एस्. सी. आणि १० वी.
* एका वर्गात फक्त वीस विद्यार्थी म्हणून वैयक्तिक मार्गदर्शन व देखरेख.
* शिकविण्याची शास्त्रीय पद्धति. इंग्रजी व गणित विषयांच्या ८ वी पासूनच्या अभ्यासाची उजळणी.
* विद्यार्थ्यांनीं केलेल्या अभ्यासाची वरचेवर तपासणी. व चांचणी
* परीक्षेंत यश मिळविण्यासाठीं खास सूचना.—चौकशीसाठीं भेटा. किंवा लिहा.

प्रमुख अध्यापक

**श्री. जयंत गुरव**
व्यवस्थापक, यशवंत अभ्यासवर्ग

**—यशवंत गोविलकर—**
बी.अस्‌सी. (ऑनर्स), अेल्‌अेल्. बी.

**चंद्रेश्वर बिल्डिंग, आर्यन हायस्कूलजवळ,**
**ऑपेरा हाऊस, गिरगांव, मुंबई ४.**

---

## मंगलमूर्ति श्री गणेश

लेखक · पु. रा. बेहेरे

**प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचा अभिप्राय**

'पुस्तक वाचतांना मीं अगदीं रंगून गेलों. हें पुस्तक लिहून तुम्ही सांस्कृतिकदृष्टया लक्षांत घेण्याजोगी कामगिरी केली आहे.'

**किंमत रु. २·१०**

विभाग
क्रमांक १३६८
नों. दि.
वाचनालय शाखा

॥ श्री ॥

# बिल्वपत्र

'शिव-सती' हें माझ्या संकलित शिव-कथामालेंतील पहिलें बिल्वपत्र आहे. सामान्य वाचक आणि विद्यार्थी यांच्यासाठींच प्रामुख्यानें हा प्रयत्न आहे. आपलें सांस्कृतिक जीवन ज्या कथांनीं घडविलें आहे त्या कथा पुन: पुन: कथन करण्याची नित्य आवश्यकता आहे. पण या ठिकाणीं मी एक विशेष प्रयत्न करीत आहे. तो प्रयत्न असा कीं, एकच कथा निरनिराळ्या पुराणांतून आणि उपपुराणांतून वेगवेगळ्या तपशिलानें सांगितलेली असते. कित्येक ठिकाणीं कथेचें सूत्र वाढविलेलें असतें. कथेंतील व्यक्तींचें चरित्र अनेक ठिकाणीं विखुरलेलें असतें. हे सर्व संदर्भ मिळतील तेवढे गोळा करून त्यांतून सलग आणि समग्र अशी कथा तयार करायची असा माझा प्रयत्न आहे.

सलग आणि समग्र कथा मांडतांना वेगवेगळे तपशील जसे एकत्र करावे लागले, तसेच परस्परविरोधी तपशिलांतून एकादा निवडून बाकीचे गाळावे लागले. पुराणांतून एकच कथा वेगवेगळ्या तऱ्हेनें कां येते याच्या मागें कांहीं हेतु असतो. आणि सगळे संदर्भ पहात गेलें म्हणजे कथेचा एक विकासक्रमहि ध्यानांत येतो. हा क्रम लक्षांत घेऊनच मी तपशिलाची निवड केलेली आहे. वेगवेगळ्या पंथांतील झगडे दूर करावे, सांस्कृतिक-दृष्टया सबंध भारतीय समाजाचें भावनात्मक ऐक्य साधावें एवढी विशाल दृष्टि या कथांच्या विकासक्रमांत आढळते. निरनिराळ्या संदर्भांचें आणि तपशिलांचें परीक्षण करून त्यांतील या सांस्कृतिक दृष्टीची चर्चा करणें हा स्वतंत्र विषय आहे. या ठिकाणीं त्या दृष्टीनें फक्त कथा कथन केलेली आहे.

एक साग्र आणि समग्र कथा सांगणें एवढाच या ठिकाणीं माझा हेतु असला तरी या कथेसंबंधीं एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. कांहीं विद्वान् सुचवितात त्याप्रमाणें ही कथा भारतीय समाजांतील एका संघर्षावरचें रूपक असो किंवा नसो; पण शिव आणि सती यांच्या

जीवनांत घडलेल्या या घटनांचा त्या वेळच्या समाजावरहि क्रांतिकारक परिणाम झालेला स्पष्ट दिसतो. आर्य आणि आर्येतर समाजाच्या संघर्षाचा आणि एकीकरणाचा इतिहासच या कथेंत आहे.

मानवी भावनांचें अत्युत्कट असें स्वरूप या कथेंत आपल्याला दिसतें. सतीचें प्रेम आणि हट्ट जितका उत्कट आहे तितकीच शंकरावरची तिची निष्ठाहि परमोत्कट अशी आहे. पतीप्रेमाचा आणि निष्ठेचा आदर्शच सतीच्या रूपानें या कथेंत घडविलेला आहे. शंकराचें सतीवरचें प्रेमहि असेंच अद्‌भुत आहे. सतीच्या देहत्यागानें प्रकट झालेला शंकराचा क्रोध जसा भयंकर तसाच सतीचें कलेवर दिसल्यानंतर त्याला झालेला शोकहि अपूर्व असाच आहे. सतीचें कलेवर खांद्यावर घेऊन शंकरानें केलेली भारत-यात्रा आणि सतीचे अवयव भारताच्या प्रत्येक प्रदेशांत पडल्यामुळें तेथें निर्माण झालेलीं शक्तिपीठें हीं भारताच्या सांस्कृतिक एकीकरणाच्या इतिहासांतील एक अद्‌भुत अशी घटना आहे. भारताच्या निरनिराळ्या भागांतील निरनिराळ्या जमाती या देवीच्या उपासक आहेत. या सर्व देवता मुळांत भिन्न असल्या तरी या कथेच्या धाग्यानें त्या सर्वांत अद्वैत प्रस्थापित करण्यांत आलें.

ज्या अनेक लोकांच्या जिव्हाळ्याच्या मदतीमुळें हें पुस्तक प्रकाशित झालें त्यांचे आभार मानून मोकळें होतां येणार नाहीं. कारण त्यांच्या-बद्दल मी सदैव कृतज्ञच आहे.

पु. रा. बेहेरे

# शिव-सती

## शिव-शक्ति




कैलास शिखरावर शिव-शंकराची समाधि लागली होती. त्याच्या अर्धांगी सती होती. शिव म्हणजे पुराण-पुरुष. सृष्टि निर्माण होण्याच्याहि पूर्वी तो होता. ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केली. त्या ब्रह्मदेवाला शिवानें उत्पन्न केलें. सृष्टीचा संरक्षक विष्णु. त्यालाहि शिवानेंच घडविलें. आणि सृष्टीचा संहारक रुद्र हेंहि त्याचेंच स्वरूप आहे. सारी सृष्टी हा शिवाचा खेळ आहे.

जसा शिव, तशीच शक्ति. ही शक्ति एकदां साकार झाली. लोक तिला दक्षकन्या म्हणूं लागले. या दक्षकन्येनें शिवाला वरलें. जेथें शिव होता तेथें शक्ति आली. जेथें शिव असेल तेथें शक्ति असायचीच.

शिवाच्या समाधींत ती ब्रह्मकलेच्या रूपानें होती. शिवानें समाधि उतरली आणि नेत्र उघडले. तेव्हां शिवाच्या संसारांत ती सती होती. ती शिवाची अर्धांगी होती.

शिव-शक्तीनें सृष्टीचा खेळ मांडला. देव, ऋषि, मुनी, यक्ष, गण, गंधर्व निर्माण झाले. यज्ञ, याग, भक्ति, योग सुरू झाले. कोणी शिव-स्मरण ठेवलें. कोणी त्याला विसरले. पण सृष्टीचा खेळ सुरू झाला. आणि शिव-शक्तिसुद्धां त्या खेळांत रमून गेली. तीच ही शिव-शक्तीची पावन कथा आहे.



# कलहाचा प्रारंभ

एकदां प्रजापतींनीं मोठा यज्ञ सुरू केला. प्रजापति म्हणजे ब्रह्मदेवाचे पुत्र. ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केली आणि ती वाढविण्याचें काम आपल्या या पुत्रांकडे दिलें होतें. सृष्टीचें कार्य चालू रहाण्यासाठीं ते नेहमी यज्ञ-याग करीत. वेदांमधून त्यांनीं एवढेंच समजून घेतलें होतें. प्रजापतींनीं असाच एक यज्ञ आरंभिला होता.

यज्ञ करायचा म्हणजे मोठीच उलाढाल होती. मोठमोठे ऋषि तेथें येणार. आपल्या शिष्यांना घेऊन मुनि हजर रहाणार. इंद्र, चंद्र असे देव येणार. देवांचा यज्ञांत मोठा मान. त्यांचा यज्ञांत हविर्भाग असे. सोमरस पिण्यासाठीं त्यांना मुद्दाम आवाहन केलेलें असे. मोठें यज्ञकुंड तयार करून त्यांत अग्नि उत्पन्न करीत आणि अग्नीच्या मुखांत आहुति दिल्या जात. वेदांचा घोष होई. प्रजापतींचा तो यज्ञ असाच थाटांत सुरू झाला होता.

यज्ञमंडप भरून गेला होता. इंद्र, चंद्र, यम, वरुण अशा लोकपालांचें तेज सर्वत्र पसरलें होतें. स्वाहाकार चालू होता. आणि अग्निनारायण प्रसन्न झाला होता. भगवान् शंकर उच्च आसनावर बसले होते. त्यांच्या शेजारींच ब्रह्मदेवहि एका आसनावर आरूढ झाले होते. यज्ञमंडपांत सभाजनांची दाटी झाली होती. इतक्यांत दक्ष प्रजापतीचें आगमन झालें. त्याला पाहून सभाजनांचे डोळे दिपले. दक्षाचें तेज आणि सामर्थ्यच तसें होतें.

दक्ष प्रजापती हा ब्रह्मदेवाचा कर्तबगार मुलगा. सृष्टीचें कार्य तो विशेषच दक्षतेनें करीत असे. सृष्टीचें कार्य म्हणजे प्रजेचें पालन. प्रजा वाढवा असें ब्रम्हदेवानें आपल्या पुत्रांना सांगितलें. नारदासारख्यांनीं ब्रह्मदेवाचा हा उपदेश ऐकला नाहीं. तो लक्षपूर्वक ऐकला

आणि मन लावून आचरणांत आणला दक्षानें. म्हणून ब्रह्मदेवानें त्याला प्रजापतींमध्येंहि श्रेष्ठ स्थान दिलें होतें.

ब्रह्मदेवाचा उपदेश ऐकून दक्षानें प्रथम स सुपुत्र निर्माण केले. आपल्या या पुत्रांना दक्षानें आपल्यासारखाच संसार रण्याचा उपदेश केला. आपल्या या मुलांचा संसार सुरळीत सुरू झाला म्हणजे आपण धन्य झाला असें दक्षाला वाटत होतें; पण नारदानें त्याच्या आशांवर पाणी ओतलें.

ते दक्षपुत्र आपल्या संसाराला लागण्यापूर्वी त्यांना नारद भेटला. भेटला कसला, तो मुद्दामच त्यांच्याकडे गेला. त्या दक्षपुत्रांनीं आपल्या पित्याची आज्ञा नारदाला सांगितली आणि त्याच मत विचारलें. नारद म्हणाला, 'वा: ! तुम्ही प्रजा निर्माण करणार, संसार वाढवणार हें फारच चांगलें आहे. पण मी म्हणतों, ज्या पृथ्वीवर तुम्ही हा संसार वाढविणार ती पृथ्वी केवढी आहे याचा शोध तुम्ही प्रथम कां घेत नाहीं ? कर्म करण्यापूर्वी ज्ञान पाहिजे. प्रथम तुम्ही ज्ञानमार्गाला लागा.' नारदाचें आकर्षक भाषण त्या दक्षपुत्रांना पटलें. ते पृथ्वीचा विस्तार, विश्वाचा शोध घेण्यासाठीं दशदिशांना निघून गले ! आणि गेले ते परत आलेच नाहींत.

आपले पुत्र प्रजा वाढविण्याचा उद्योग सोडून ज्ञानमार्गानें दश-दिशांना गेले हें पाहूनहि दक्षानें धीर सोडला नाहीं. त्यानें पुन्हा सहस्र पुत्र निर्माण केले. त्यांना संसारकर्माचा उपदेश केला. पण नारद त्याच्यामागें हात धुवूनच लागला होता. तो या दक्षपुत्रांकडे आला. प्रजा वाढविण्याच्या त्यांच्या संकल्पाची त्यानें तारीफहि केली. आणि मग त्यानें हळूच त्यांना म्हटलें; 'पण तुमचे वडीलबंधू विश्वाचा विस्तार पहाण्यासाठीं ज्ञानमार्गानें गेले आहेत. तुम्ही प्रथम आपल्या भावांचा शोध घ्यायला हवा. त्यांनीं काय मिळविलें तें तुम्ही पहा. आणि मग संसार

वाढवायला तुम्ही मोकळेच आहांत.' हे दक्षपुत्रहि नारदाच्या उपदेशाला भाळले आणि आपल्या भावांचा शोध घेण्यास तेहि दशदिशांना गेले.

नारदाच्या उपदेशामुळें आपले पुत्र ज्ञानमार्गानें जाऊन देशोधडीला लागले हें पाहून दक्षाला संताप आला. त्यानें नारदाला गांठलें आणि त्याला विचारलें, ' तूं माझ्या पुत्रांना देशोधडीला कां लावलेंस ?' नारद म्हणाला, ' तुझा मार्ग निराळा, माझा निराळा. माझा मार्ग त्यांना पटला. संसार करीत बसण्याऐवजीं ते विश्वाचें कोडें सोडवीत गेलें. ' नारदाचें हें उत्तर ऐकतांच दक्ष अधिकच संतापला. नारदानें आपला अपमान केला असें त्याच्या मनानें घेतलें. तो क्रोधानें म्हणाला, ' माझ्या पुत्रांना तूं संसार करीत बसूं दिलें नाहींस. म्हणून तुलाहि जगांत कोठें स्थैर्य लाभणार नाहीं. तूं अखंड भ्रमणच करीत रहाशील. माझा तुला हा शाप आहे. '

दक्षानें नारदाला शाप दिला. पण तो आपल्या कर्ममार्गापासून ढळला नाहीं. तो पुत्रशोकानें उदासीन झाला नाहीं. तो आपल्या कर्तव्याला दक्ष राहिला. त्यानें साठ कन्या निर्माण केल्या. प्रजांचा विस्तार करण्यासाठीं, संसार वाढविण्यासाठीं या कन्या त्यानें निरनिराळ्या महात्म्यांना दिल्या. आज या जगांत दक्षाच्या त्या साठ कन्यांच्या प्रजांचाच विस्तार झाला आहे. दक्षानें आपल्या दहा कन्या धर्माला दिल्या. कश्यप ऋषीला तेरा कन्या अर्पण केल्या. नक्षत्रासारख्या सत्तावीस मुली चंद्राला दिल्या. अरिष्टनेमीला चार, भृगुनंदाला दोन, कृशाश्वाला दोन आणि अंगिरा ऋषीला एक असें आपल्या कन्यांचें दान केलें. त्याचे हे सगळे जामात त्याच्या मनासारखे संसारी, सामर्थ्यवान, तेजस्वी आणि वैभवशाली होते. त्याच्या मतासारखा जामात त्याला मिळाला नव्हता तो एकच शिवशंकर. त्याची हट्टी कन्या सती हिनें शंकरालाच माळ घातली त्यामुळें त्याचा नाइलाज झाला होता.


असा हा प्रतापी दक्ष प्रजापतींच्या यज्ञमंडपांत आला तेव्हां त्याच्या तेजानें सभाजनांचे डोळे दिपले. दक्षाला पहातांच प्रजापती त्याला सामोरे गेले. त्यांनीं त्याचें स्वागत केलें. खांद्यावरचें उत्तरीय वस्त्र सांवरीत मंदस्मित करून दक्षानें त्या स्वागताचा स्वीकार केला. एकदां सभाजनांवर त्यानें नेत्रकटाक्ष फेंकला. त्याची नजर जाण्यापूर्वींच ऋषीमुनी मोठ्या आदरानें उभे राहिलेले होते. इंद्र, चंद्र, यम, वरुण असे लोकपाल आसनावरून खालीं उतरून त्याला अभिवादन करीत होते. प्रत्यक्ष अग्नीहि दक्षाच्या आगमनानें प्रसन्न होऊन प्रज्वलित झाला होता. इतर सभाजन तर हात जोडून त्याला वंदन करीत होते.

साऱ्या यज्ञमंडपांत दक्षाच्या स्वागतासाठीं उठले नव्हते फक्त दोघेच. एक दक्षाचा पिता ब्रह्मदेव आणि दुसरा महादेव शंकर. सभेनें केलेला सत्कार स्वीकारून दक्ष ब्रह्मदेवाकडे गेला. आपल्या पित्याला त्यानें वंदन केलें. तेथेंच एका उच्चासनावर शिवशंकर डोळे मिटून बसले होते. त्यांना पहातांच दक्षाच्या कपाळाची शीर ताड्कन उठली. आपल्या स्वागतासाठीं शंकर उठला नाहीं; इतकेंच नव्हे तर आपल्या आगमनाकडे त्याचें लक्षहि नाहीं हें पहातांच दक्षाला तिडिक आली. त्याचे डोळे लाल झाले. संतापानें थरथरतच तो आपल्या आसनावर जाऊन बसला.

आसनावर बसल्यानंतर त्यानें शंकराकडे एकदां वक्रदृष्टीनें पाहिलें. महादेवाच्या मुखावर मंदस्मित खेळत होतें. अर्धवट मिटलेल्या नेत्रांनीं तो आपल्याच आनंदांत मग्न असल्यासारखा दिसत होता. दक्षाकडे त्याचें लक्षहि नव्हतें. शंकर मुद्दाम आपली अवहेलना करीत आहे असें दक्षाला वाटलें. त्याचा क्रोध अधिकच भडकला. समोर यज्ञ–कुंड धगधगत होतें तसें त्याचें अन्तःकरण धगधगूं लागलें. त्याला

अपमान असह्य झाला. क्रोधावेग त्याला आवरेना. संतापानें थरथरतच तो आपल्या जागीं उभा राहिला. त्याच्या डोळ्यांतून ठिणग्या पडत होत्या. तो आवेशानें म्हणाला, ‘ सभासदहो, ही गोष्ट तुम्हांला कशी सहन होते ? ’

दक्षाचा तो आवेशयुक्त स्वर ऐकून सारी सभा दचकली. ते चकित होऊन पाहूं लागले. शंकरानें सहकार न केल्यामुळेंच दक्षप्रजापति क्रुद्ध झाला आहे हें त्यांच्या लक्षांत आलें. पण कोणीही उघड कांहीं बोललें नाहीं. ब्रह्मदेवहि तटस्थ होता. त्यामुळें दक्षाला अधिकच चेव आला. तो बोलूं लागला, ‘ देवांसह ऋषिजनहो, सज्जनांचा आचार



काय असतो हें मी तुम्हाला सांगावें काय ? मी मत्सरानें बोलत नाहीं. पण इंद्र आणि अग्नि हे सुद्धां माझ्या सत्कारासाठीं उभे राहिले. मग हा शिष्टाचार हा शंकर कां दाखवीत नाहीं ? याचें हें वर्तन निंद्य आहे. या यज्ञसभेला शंकरानें खरोखर लाज लावली आहे.

तुम्ही श्रेष्टांनीं माझा सन्मान केला आणि शंकरानें अपमान केला. माझ्या कन्येचा हा पति आहे. त्यामुळें मी गुरुप्रमाणें याला वंद्य आहें, पित्याला द्यावा तसा मान यानें मला दिला पाहिजे. पण याचा आचारच भ्रष्ट आहे. माझी परम पवित्र अशी कन्या याला वरण्याचा हट्ट धरून बसली म्हणून मी तिला याचें पाणिग्रहण करूं दिलें. नाहीं तर अशा अमंगल पुरुषाला माझी शुभांगी कन्या कधींहि दिली नसती. हा कधीं स्नानसंध्या करीत नाहीं. यज्ञयागांचें महत्त्व याला वाटत नाहीं. कुठेंहि स्मशानांत हा बसून रहातो.

भयंकर स्मशानांत भूतगणांच्या सहवासामध्यें आनंद मानणाऱ्या या शंकराला खरोखर या यज्ञमंडपांत स्थानच नाहीं. चिताभस्म अंगाला फासून नरकपालांच्या माला गळ्यांत घालणाऱ्या या भूतनाथाला पिशाच्चांच्याच संगतींत राहूं दे. तेंच स्थान याला योग्य आहे. प्रमाथी गण हे याचे अनुचर. याचें नांव शिव असलें तरी हा अपवित्र आहे. ब्रह्मदेवानें अनुमोदन दिलें म्हणूनच सती सारखी अर्धांगी याला मिळाली. पण हा यज्ञस्थानीं शोभत नाहीं.'

दक्ष प्रजापती क्रोधावेशानें भराभर बोलत होता. सभासदांचें मत पहाण्यासाठीं तो त्यांच्याकडे वारंवार पहात होता. कोणीहि बोलून त्याला अनुमोदन देत नव्हतें. पण भृगु ऋषि शंकराकडे पाहून दाढी मिशी हलवून हंसत होता. 'ठीक आहे.' असें सुचवीत भगदेव डोळ्यांनीं खुणावीत होता. पूषा दांत काढून हंसत होता, पण शंकरासमोर दक्षाला उत्तेजन देण्याची इतरांची छाती नव्हती. दक्षानें केलेली शिवनिंदा ब्रह्मदेवाला अप्रशस्त वाटत होती. नंदिकेश्वर अस्वस्थ होत होता. पण शिवशंकर शांत होता. हें पाहून दक्षाला अधिकच चेव आला.

दक्षानें कमंडलू उचलला आणि आपल्या हातावर उदक सोडून तो म्हणाला, 'देव आणि ऋषि हो, या अपवित्र शंकराला यज्ञमंडपांत स्थान

नाहीं. इतर देवांबरोबर त्याला हविर्भाग मिळता कामा नये. ' अशी भयंकर शापवाणी उच्चारून दक्ष खालीं बसला. आतां मात्र सभेंतील कांहीं प्रमुखांनीं दक्षाचा निषेध केला. पण हा निषेध ऐकण्याच्या मनःस्थितींत तो नव्हता. सर्व सभासद आपलें म्हणणें मान्य करीत नाहींत असें पाहून तो उठला आणि दणदण पाय आपटीत सभेंतून निघून गेला. सभेंत खळबळ माजली. दक्षासारखा प्रजापति, यज्ञ कर्मांतील ज्ञाता रागावून गेला. अनेकांना याचाच खेद झाला. आपली निंदा ऐकूनहि शंकर शांत होते. पण पशुपतीच्या अपमानानें नंदीला क्रोध आला.

दक्ष निघून जात आहे असें पाहून नंदिकेश्वर उठला. ' शिवशंकराचा द्वेष करणारे मूर्ख आहेत! ' तो कडाडला. सभा विस्मित होऊन पाहूं लागली. नंदिकेश्वरानें सरबत्ती सुरू केली. ' शंकर कोणाचाहि द्वेष करीत नाहीं. ज्यांनीं ही त्याची निंदा मान्य केली त्यांचा नाश होईल. यज्ञकर्मांत पशुहिंसा करून तुम्हीं त्याची प्रौढी मिरवतां. तुम्ही स्वार्थी आहां. कर्मकांडानें तुमची बुद्धि जड झाली आहे. तुम्हांला जीव आणि देह यांचीच चिंता आहे. तुम्ही शिव जाणत नाहीं. तुम्हांला ज्ञान नाहीं. तुम्ही अजापुत्रांना बळी देऊन स्वतःच अजापुत्राप्रमाणें निर्बुद्ध व्हा. या दक्षाला बोकडाचें तोंड प्राप्त होवो. त्याला शिव-निंदेचें प्रोत्साहन देणाऱ्या या भृगु ऋषीचे अनुयायी तप आणि वेदाध्ययनहि पोट भरण्यासाठीं करतील. हे कसले ब्राह्मण! हे कर्मठ भिक्षा मागत हिंडतील ! '

नंदिकेश्वराच्या शापानें सभेंत एकदम तंग वातावरण निर्माण झालें. दक्षाचे पक्षपाती चिडले. आपल्या अपमानानें ते दांत ओंठ खाऊं लागले. नंदिकेश्वरानें यज्ञ मार्गावरच हल्ला केला होता. म्हणून भृगु ऋषि संतप्त झाले. ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, ' हें सर्व पाखंड आहे. यज्ञकर्माला विरोध करणारे हे शंकराचे गण अपवित्र आहेत, हे

पाखंडी होतील.' भृगु ऋषीच्या शापानें यज्ञ-सभा हादरून गेली. आतां पुढें काय होणार, हा यज्ञ तरी कसा पूर्ण होणार अशी चिंता प्रजापतींना वाटूं लागली. शिवगणांचे बाहू स्फुरण पावूं लागले. यज्ञ-कुंडांतल्या ज्वाळा मंदावल्या. सगळीकडे धूर पसरल्यासारखें दिसूं लागलें.

शिवशंकर शांत होते. पण यज्ञमंडपांतील गंभीर परिस्थिति त्यांना दिसत होती. भडका उडण्यापूर्वी आपल्या गणांना आंवरणें आवश्यक आहे हें त्यांनीं ओळखलें होतें. कारण आपले गण अपमान सहन करणार नाहींत हें त्यांनीं ओळखलें होतें. संघर्ष टाळण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे यज्ञांतून बाहेर निघून जाणें. शंकर आसनावरून उठले आणि मंडपांतून बाहेर निघून गेले. त्यांच्या मागोमाग नंदी उठला, शिवगण उठले; त्या सर्वांनीं यज्ञाकडे पाठ फिरविली आणि शंकराच्या मागोमाग कैलासाचा मार्ग धरला.

प्रजापतींना खेद झाला, तसेंच थोडें समाधानहि वाटलें. यज्ञा-वरचें संकट टळलें असें त्यांना वाटलें. पुन्हा यज्ञ सुरू झाला. शंकरा-शिवाय यज्ञ पूर्ण झाला. दक्षानें तर आपली प्रतिज्ञा खरी केली होती. शंकराशिवाय यज्ञ करण्याची रीतच त्यानें पाडली.



# द्वेष भडकला

श्रीशंकर भूतगणांसह कैलासाला आले. प्रजापतींचा यज्ञ पुरा होण्यापूर्वींच शंकर कां परत आले असावे असा सतीला प्रश्न पडला. तिनें शंकरांना तसें विचारलेंहि, पण ते थांग लागूं देत नव्हते. 'काय त्या यज्ञांत पहायचें ? तेथें कंटाळा आला म्हणून परत आलों. त्या यज्ञमंडपापेक्षां हा कैलासच मला अधिक प्रिय आहे. कां अधिक प्रिय असेल सांग बरें ?' शंकरानें उलट सतीलाच प्रश्न विचारला.

'तें मला काय ठाऊक ?' सती म्हणाली.

'तुला ठाऊक नाहीं ? मग सांगतों. यज्ञमंडपांत दक्ष होता. पण दाक्षायणी नव्हती. शक्ति नसली तर शिव तेथें कसा राहील ? म्हणून कैलासावर शिव-शक्ति एक झालीं !' शंकरांनीं खुलासा केला.

'शक्ति आली असतीना यज्ञाला ! मग तिथें मला माझा पिताहि भेटला असता.'

'होय, पण यज्ञकर्मांत शिव-शक्ति कशीं एकत्र राहूं शकतील ? त्या कर्मकांडांत तर अहंकार आहे. पशुहिंसा आहे. शिवशक्तीचा संचार या दऱ्याखोऱ्यांत आहे, या भूतगणांमध्यें आहे. या ठिकाणीं शक्ति एकटी राहूं नये म्हणून यज्ञ सोडून शिव येथें आला आहे.' सतीला हें उत्तर देऊन शंकर खदखदून हंसले. सतीचेंहि मन प्रसन्न झालें. देवदार वृक्षांच्या गर्दींतून हिमालयाच्या शिखरांवर ती शंकराबरोबर विहार करूं लागली. प्रजापतींचा यज्ञ ती विसरून गेली.

सतीला यज्ञयागांची खूप माहिती होती. पण त्या यज्ञांचें तिला आकर्षण नव्हतें. तिचा पिता यज्ञ-कर्म-विशारद होता; यज्ञांचा अभिमानी होता. त्याला यज्ञांपुढें दुसरा विचारच सुचत नसे. दक्ष प्रजापतीनें केलेले कितीतरी यज्ञ सतीनें लहानपणापासून पाहिले होते.

त्या यज्ञांमुळें आपला पिता हेकेखोर झाला आहे असें तिला वाटे. त्याला विचार करायला वेळच नव्हता. विचारांच्या अभावामुळें मोकळेपणा नव्हता. सगळीं बंधनें होतीं. अशा यज्ञांना आपला पति महत्त्व देत नाहीं याचा तिला अभिमान वाटे.

नगरें-पुरें सोडून शिवशंकर स्मशानांत रहातो याचा तिला विषाद वाटत नव्हता. कारण महास्मशानांतहि मांगल्य निर्माण करण्याचें शिवाचें अद्‌भुत सामर्थ्य तिला माहीत होतें. नगरा-पुरांत यज्ञ करून तेथें पशूंचें स्मशानच नाहीं का निर्माण होत? त्यापेक्षां स्मशानांत पावित्र्य फुलविणें किती श्रेष्ठ! देवमानवांचें वैभव तिनें पाहिलें होतें. तिचा पिता दक्ष महा वैभवशाली होता. आणि त्या वैभवांतच ती वाढली होती. पण वैभवाच्या मागें धांवण्यापेक्षां वैभव भिरकावून देण्याचें सामर्थ्य तिला अधिक मोठें वाटे. त्रैलोक्याच्या वैभवाची राख करून ती आपल्या अंगाला फांसणारा प्रलयंकारी रुद्र तिला सर्वश्रेष्ठ वाटत असे.

आणि त्या राखेंतून त्यांनीं कैलासाचें अपूर्व वैभव निर्माण केलें होतें. आकाश ठेंगणें वाटेल अशा हिमशिखरांचे कळस तेथें होते. आकाशाच्या छताला देवदार वृक्षांचे असंख्य खांब लावलेले होते. चंद्राची शुभ्रता घेऊन वनगाई तेथें फिरत होत्या. आणि त्यांचें वर्णसौंदर्य पाहून बर्फाच्या शुभ्र डोलावरहि काळसर रेषा उमटे! आकाशांतली चंद्रकोर जटामुकुटावर लावून त्या गिरीशिखरावर कैलासनाथ ध्यानमग्न झाले कीं सती आपलें देहभान विसरे आणि तन्मय होऊन जाई.

सती शंकराशीं इतकी तन्मय होई म्हणूनच तिनें दक्षाचा विरोध असतांहि शिवाला वरलें होतें. तिची माता प्रसूति हिचा तिला पाठिंबा होता. पण आपल्या पतीपुढें, दक्षापुढें बोलण्याचें धैर्य तिला नव्हतें. सती

दक्षाची लाडकी मुलगी होती आणि तितकीच हट्टी होती. म्हणूनच दक्षानें नाखुषीनें कां होईना पण तिची इच्छा मान्य केली होती. सतीनें शंकराला वरण्याचें ठरविलें तेव्हां फक्त ब्रह्मदेवाच्या शब्दाचाच तिला उपयोग झाला. नाहीं तर नुसत्या सतीच्या हट्टालाहि दक्षानें दाद दिली नसती. त्याला शंकराचा आचार मुळींच आवडत नसे. शंकराचें स्वरूप ओळखण्याइतका त्याला विचार नव्हता. यज्ञयाग करून त्याला ताठा आला होता. त्याचा स्वभाव आणि त्याची बुद्धि हीं देखील ताठर झाली होती. सतीशी विवाह होऊन शंकर आपला जांवई झाला म्हणजे त्याची वागणूक बदलेल, असें त्यानें स्वतःचें प्रथम समाधान करून घेतलें. पण त्याची ती समजूत खोटी ठरली. शंकराची स्मशान-क्रीडा आणि वनविहार थांबले नाहींत. उलट सती मात्र शिवाबरोबरच रमली. मग दक्षानें शंकराचें नांवच टाकलें! मन कठोर करून सतीचाहि विचार त्यानें मनांतून काढून टाकला. यज्ञांतून निघणारा धूर त्याच्या डोळ्यावर आला होता. त्यामुळें प्रसूतीचें आपल्या कन्येसाठीं, सतीसाठीं गलवलणारें काळीज त्याला कधीं दिसलें नाहीं. सतीचेंहि हृदय आपल्या मातेला भेटण्यासाठीं कासावीस होई. पण तीहि दक्षाचीच मुलगी. होती. आणि दक्षपिता शंकराला बोलावीत नाहीं, आपल्याला माहेरीं नेत नाहीं तोंपर्यंत आपणहि जायचें नाहीं असेंच तिनें ठरविलें होतें.

शंकराबरोबर हिमालयाची शोभा पहात असतांना मध्येंच तिला माहेरची आठवण आली. आणि आपल्या विवाहाची सगळी कथा तिच्या मनांत येऊन गेली. आणि मग प्रजापतींचा यज्ञहि तिच्या नजरेसमोर उभा राहिला. शंकर मध्येंच यज्ञांतून आले ते आपल्याला भेटण्यासाठींच असतील कीं तेथें आणखी कांहीं झालें असेल? शिव-शंकराच्या मुखाकडे पाहून कांहीं समजणारें नव्हतें. तेथें नेहमींचीच प्रसन्नता होती. पण यज्ञांतून मध्येंच उठून येऊन शंकर प्रजापतींचा विरस कसे करतील? स्मशान, यज्ञभूमी आणि कैलास शिखर कोठेंहि

ते सारखेच प्रसन्न रहाणार. मग ते तेथून कां आले असतील ? यज्ञांत दक्ष येणारच; त्यानें शिवशंकराचा अपमान तर केला नसेल ? सतीचें मन भरकटूं लागलें.

सतीला फार वेळ संशयांत रहावें लागलें नाहीं. भूतगणांत तीच चर्चा चालली होती. नंदिकेश्वर धुसफुसत होता. प्रजापतींच्या यज्ञांत दक्षाच्या तोंडून निघालेल्या शब्दांचे चटके त्या भूतगणांना अजूनहि बसत होते.

' सती आमची माता आहे नाहीं तर मी दक्षाला तेथेंच ठार केलें असतें ' एका गणानें मुठीवर मूठ आपटीत म्हटलें.

'त्या दुष्टाची सती ही मुलगी असणेंच शक्य नाहीं. सतीचें तेज कुठें आणि तो धुरकट दक्ष कुठें !' दुसऱ्या भूतगणानें तिरस्कारानें उत्तर दिलें.

सर्व शिवगणांना सती शंकराइतकीच प्रिय होती. शिव-सती हें त्यांचें दैवत होतें. शिव-सती हीं एकरूपच आहेत, शिव हा अर्धनारीश्वर आहे असेंच ते मानीत. शिवाच्या वामांगांतून सती बाहेर आली आणि ती मग दाक्षायणी झाली अशी कथा प्रमाथी गण सांगत. शिव-सती हीं जगाचीं मातापितरें आहेत.

नंदिकेश्वरानें मान हलविली. तो म्हणाला, ' सती दाक्षायणी आहे. तिन्हीं लोकांच ती सौभाग्य आहे.' सर्व भूतगण नंदिकेश्वराभोंवतीं जमले. त्याला अनेक कथा ठाऊक होत्या. सतीची कथा तो सांगणार म्हणून सर्वांनीं आपले श्वाससुद्धां आवरून घेतले.

' पूर्वी प्रलयकालीं भूः भुवः आणि स्वः हे लोक जळाले. तेव्हां या तिन्ही लोकांतील सर्व प्राणिमात्रांचें सौभाग्य वैकुंठांत गेलें आणि भगवान् विष्णूच्या आश्रयाला राहिलें. "

' मग ? तें दक्षाकडे कसें आलें ? '

'दक्षाचा पिता ब्रह्मदेव एकदां दक्षासारखाच अहंकारानें फुगून गेला आणि मग तो स्वतःलाहि विसरला. गर्वानें तो प्रत्यक्ष भगवान् विष्णूशीं स्पर्धा करूं लागला. त्याच्या या स्पर्धेनें एक ज्वाला उत्पन्न झाली आणि त्यामुळें विष्णूचें हृदय तापलें. त्यामुळें त्या हृदयाच्या आश्रयानें राहिलेलें हें सौभाग्य रस होऊन त्याची पृथ्वीवर धार पडूं लागली. भाग्यशाली दक्षानें तें सौभाग्य प्राशन केलें. त्यामुळें ही ललिता सती जन्म पावली.'

असे भूतगणांचे संवाद चालले होते. मध्येंच, यज्ञकुंडांतून ज्वाला निघाव्या तसे भूतगणांच्या क्रोधाचे उद्‌गार बाहेर पडत होते. त्यांचें एकेक वाक्य ऐकतां ऐकता प्रजापतींच्या यज्ञाचें चित्र सतीच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. शिवाचा अपमान करणाऱ्या पित्याचा तिलाहि क्रोध आला. 'मला कोणी दाक्षायणीसुद्धां म्हणूं नका.' तिनें शिवगणांकडे पहात शिवाला सांगितलें. शंकर फक्त हंसला.

दिवसांमागून दिवस लोटले. सतीनें कधीं दक्षाचें नांवहि काढलें नाहीं. तिला मध्येंच आपल्या आईची आठवण होई. बहिणींचें स्मरण होई. दक्षाला नाहीं; पण आईला भेटावें असें तिच्या मनांत येऊन जाई. पण निग्रहानें ती सारे विचार आपल्या मनांतून काढून टाकी. शिव-स्वरूप डोळ्यांनीं पहावें आणि हृदयांत सांठवून ठेवावें हाच तिचा उद्योग सुरू होई. शंकराच्या खांद्यावर मस्तक टेंकून ती डोळे मिटून घेई. त्या कर्पूरगौराच्या स्पर्शानें तिचें मन शांत होई.

कैलासावर सती एकटीच बसली होती. आणि तिला 'नारायण' असा वीणेसारखा मधुर ध्वनी ऐकूं आला. नारदच येत होते. नारदांकडून त्रैलोक्यांतल्या गोष्टी कळायच्या. प्रसूति मातेचें आणि बहिणींचें

क्षेम कुशल तिला नारद सांगत. त्यामुळें नारदांच्या आगमनानें ती प्रसन्न झाली. तिनें त्याचें स्वागत केलें.



‘ हें काय ? तूं नाहीं गेलीस ? ’

‘ कुठें ? ’

‘ म्हणजे ? तुला कळलें नाहीं ? ’

‘ काय ? ’ सतीनें अधीरतेनें विचारलें.

‘ दक्षाला ब्रह्मदेवानें प्रजापतींचा अध्यक्ष म्हणून अभिषेक केला. आतां दक्षाकडे यज्ञांमागून यज्ञ सुरू आहेत. नुकताच एक यज्ञ संपला; आतां बृहस्पतिसत्र सुरू आहे. तेथें सर्व देव, ऋषि, मुनी, पितर यांची गर्दी उडाली आहे. आणि दक्ष सर्वांचा सत्कार करीत आहे. ’


‘ असेल ! म्हणून मी कशाला जाईन ? ’ सतीनें त्वेषानें उत्तर दिलें.

‘ वाः ! असें सत्र दक्षाशिवाय दुसऱ्या कोणाच्या घरीं पहायलाहि मिळायचें नाहीं. आणि दक्ष तर तुझा प्रत्यक्ष पिता ! ’

‘ म्हणून काय मी निमंत्रणाशिवाय जाऊं ? ’

‘ हो; माहेरीं जायला निमंत्रण कशाला ? आणि यज्ञाला तर न बोलवतांहि जावें. ’

सती विचारांत पडली. तिनें नेत्र मिटले. तिनें डोळे उघडले तेव्हां नारद निघून गेला होता. ती आपल्याशींच म्हणाली, ‘ नाहींच जायचं.’



# सती बिथरली

दक्ष-यज्ञाला नाहींच जायचें, असें सतीनें ठरविलें, पण तो विषय तिच्या मनांतून जाईना. तिच्या डोळ्यांसमोर आपल्या माहेरीं चाललेल्या त्या महोत्सवाचें चित्र एकसारखें उभें रहात होतें. तें चित्र पुसून टाकून ती शिवाचें ध्यान करी. पण मग तिला दक्षयज्ञांतच शिव-शंकर दिसूं लागे. आणि ती अस्वस्थ होऊन जाई. शंकराचें ध्यान करतां करतां दक्षयज्ञांत वावरणारी तिची आई तिला दिसूं लागे. तिच्या भोंवतीं आपल्या बहिणी मिरवत असलेल्या सतीला दिसत. आपल्या मातेची दृष्टि यज्ञमंडपांत भिरभिर फिरते आहे; ती आपल्या सतीला शोधते आहे, सती दिसेना म्हणून तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळताहेत हें दृश्य दिसूं लागतांच सतीचें हृदय विरघळूं लागे. तिच्याहि नेत्रांतून अश्रू वाहूं लागत.

दक्ष-यज्ञाची गोष्ट तिनें शंकराकडे काढली नव्हती. शंकराला ठाऊक नाहीं अशी कोंणती गोष्ट आहे ? तेव्हां त्यानें आपण होऊन त्या यज्ञाचा विषय काढावा, 'तूं जाणार तर जा; मीहि येईन' असें म्हणावें असें सतीला वाटे. दक्ष-यज्ञांत तिला शिव-शंकर दिसत होते. पण शंकर तेथें येतील कां ? आपल्याला घेऊन तेथें जातील कां ? असें विचाराचें काहूर सतीच्या मनांत उठे. पण तिनें शंकराला दक्ष-यज्ञाबद्दल कांहीं सांगितलें नाहीं. कांहीं विचारलें नाहीं. ती नेहमीं-प्रमाणें शिवाबरोबर हंसे, खेळे. शंकर ध्यानमग्न असतांना तीहि त्याचें ध्यान करी. शिव-शंकराबरोबर ती वनविहार करी.

असाच वनविहार करीत असतांना गीतासारखा मंजुळ ध्वनी वाऱ्याबरोबर तिला ऐकूं येऊं लागला. तो ध्वनी स्पष्ट होऊं लागला तसतसे सतीच्या अंगावर रोमांच उभे राहिले. एका कुंजाआड कांहीं गंधर्वांचीं जोडपीं दक्षाच्या यज्ञाचें गुणगान करीत होतीं. त्या यज्ञांतील

शोभा, तिथलें वैभव, दक्षाचें ऐश्वर्य आणि औदार्य हाच त्यांच्या गुणगानाचा विषय होता. किती देव आणि किती ऋषि ! त्या सर्वांना तेथें अहेर मिळत आहेत. देवस्त्रिया, ऋषिपत्न्या यांना वस्त्रालंकारांचे अहेर होत आहेत. असा समारंभ आणि उत्सव देवांनाहि दुर्लभ आहे. असे ते गंधर्व दक्षाचें स्तुतिस्तोत्र गात होते.

सतीच्या डोळ्यांसमोर तो दक्षयज्ञ उभा राहिला. त्यात मिरवणाऱ्या आपल्या बहिणी दिसूं लागल्या; आपली आई प्रसूति तिच्या नजरेसमोर आली. तिची नजर भिरभिरूं लागली. तिनें शिवाच्या मुखाकडे पाहिलें. तो नेहमींप्रमाणेंच प्रसन्न होता. सतीनें विचारलें, 'ऐकलंत काय म्हणताहेत तें ! या गंधर्वांचाहि तेथें सत्कार झाला.'

शंकर हंसले, सतीला थोडा धीर आला. तिची उत्सुकता वाढली. ती अधीरपणें म्हणाली, 'मग ? दक्ष-यज्ञाबद्दल तुम्हांला काय वाटतं ?'

शंकर पुन्हा हंसले. ते प्रसन्न वाणीनें म्हणाले, 'दाक्षायणि, खरोखरच यज्ञ अपूर्व आहे. दक्ष प्रजापतीच्या ऐश्वर्याची धन्य आहे.' आणि शंकरांनीं तिला आकाशांतली मौज दाखविली. हंसाच्या आकाराचीं अनेक सुवर्णाचीं विमानें आकाशांतून पोहत जात होतीं. देवांचे शेले आणि देवस्त्रियांचे पदर त्या विमानांच्या पंखांप्रमाणें फडकत होते. सतीनें तीं विमानें पाहिलीं. आपला देह हवेंत तरंगतो आहे असें तिला वाटूं लागलें. शिवशंकर दक्षयज्ञावर प्रसन्न आहेत असें पाहून तिला हर्ष झाला.

'मग ईश्वरा, चला तर ! आपणहि जाऊं या. देवस्त्रियांप्रमाणें मीहि तुमच्यासह यज्ञाला जाईन.' ती लाडिकपणें म्हणाली.

शंकरानें मान हलविली. ते म्हणाले, 'नाहीं ! सती, हें तूं भलतेंच काय बोलतेस ?'

'यांत मलतेंच काय झालें ? दक्षयज्ञाची तुम्हीहि स्तुति केली ना आतां ?'

'मी दक्षाच्या ऐश्वर्याला धन्य म्हटलें. पण तुला तें ऐश्वर्य मोह पाडतें कां ?'

'माझ्या पित्याच्या ऐश्वर्याची मला पर्वा नाहीं. माझ्या पतीचें ऐश्वर्य त्याहून मोठें आहे. पण मी यज्ञाला जाणार !'

'तूं दक्षयज्ञाला जाणार ? शिवाची सती निमंत्रणाशिवाय जाणार ?'

'होय. काय हरकत आहे ? दाक्षायणीला दक्षाच्या निमंत्रणाची गरज नाहीं. माझ्या माहेरीं जायला मला आमंत्रण नको. माझ्या वहिणीं-मध्यें मिसळायला मला आमंत्रण नको. माझ्या आईला भेटायला मला आमंत्रण नको. म्हणून मी जाणार ! आणि आतां तर तिथें यज्ञ आहे.' सतीचा आवाज कठोर झाला.

'सती, तूं माहेरीं जाणार कीं यज्ञाला जाणार ? माहेरीं जाणार तर इतके दिवस कां गेली नाहींस ? आमंत्रणाशिवाय तूं आतां यज्ञाला जाणार ?'

'इतक्या दिवसांत गेलें नाहीं. म्हणूनच आतां जाणार. माहेरीं जाणार. यज्ञाला जाणार ! यज्ञाला जायला मुळीं आमंत्रणच नको.' सतीचा आवाज अधिकाधिक कठोर होत होता.

'बरोबर आहे.' शंकर जड आवाजांत म्हणाले, 'मातापित्यांकडे आणि यज्ञाला न बोलावतांहि जावें ! हें खरंच आहे.'

'मग, जायचं ना आपण ?' सतीचा आवाज एकदम मृदु झाला.

'नाहीं.' शंकर निश्चल आवाजांत म्हणाले.

'मग बरोबर काय आहे ?' सतीच्या आवाजाला धार आली.

'तत्त्व बरोबर आहे. पण तें माझ्यासाठीं नाहीं.'

'पण माझ्यासाठीं आहे.'

' नाहीं. तें शिवासाठीं नाहीं, सतीसाठींहि नाहीं. दक्ष तुझा पिता आहे, ऐश्वर्यसंपन्न आहे, पण तो अहंकारी आहे. तो माझा द्वेष करतो. त्याचें वैभव मोठें आहे, पण मन क्षुद्र आहे. '

' म्हणून तुम्ही येणार नाहीं ? '

' नाहीं. आणि तूंहि जाऊं नको. '

' मी जाऊं नको ? मी जाणार ! मी आईला भेटणार, बहिणींना भेटणार. दक्ष माझा पिता आहे. मला पाहून त्याला आनंद होईल. '

' साफ खोटं आहे. तो तुझा अपमान करील. सती, अपमान हा सज्जनांना मृत्युपेक्षांहि तीक्ष्ण असतो. '

' माझा अपमान होणार नाहीं. '

' सती, तूं हट्ट सोड. तुझा अपमान झाला तर मला अतिशय दुःख होईल. मग माझ्या क्रोधानें दक्षाचा नाश होईल. सतीला शिवापेक्षां कांहीं श्रेष्ठ नाहीं असें तूंच म्हणत होतीस ना ? '

' होय, होय ' सतीला हुंदका आला. तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले.


' शिवालाहि सतीपेक्षां कांहींहि अधिक प्रिय नाहीं. दाक्षायणि, तूं यज्ञाला जाऊं नको. '

' नाहीं. पण मी जाणार. ' सतीचा निश्चय उसळून आला. हें दुश्चिन्ह आहे हें शंकर समजले. सतीचें मन विव्हळ झालें होतें. जावें कीं न जावें हा निश्चय होत नव्हता. ' जाणार ' हे शब्द तोंडांतून बाहेर पडले होते. पण पाय वळत नव्हते. जाऊं कीं नको याचें उत्तर तिचें मन देत नव्हतें. मन आंदोलित होत होतें. तिचा देह थरथरत होता. एकीकडे शिव-शंकराची मूर्ति तिला खेंचीत होती, दुसरीकडे यज्ञांतल्या दृश्याकडे तिचें मन ओढ घेत होतें. तिचीं पावलें मागें वळत, पुन्हां पुढें जात. ती चार पावलें पुढें टाकी; दोन पावलें

मागें येई. मन हेलकावे खात होतें, देह कांपत होता. पावलें मागें पुढें होत होतीं.

तिनें शंकराकडे पाहिलें. शिव नेत्र झांकून ध्यानमग्न झाले होते. सतीनें डोळे मिटले. तीहि शिव-ध्यान करूं लागली. पण तिला दक्ष-यज्ञ दिसूं लागला. वेदघोष ऐकूं येऊं लागले. यज्ञकुंडांतल्या ज्वाला हालत होत्या. त्या आपल्याला बोलावीत आहेत, आपली आई आपल्याला बोलावीत आहे असें तिला वाटलें. 'मी जाणार, जाणार' ती एकदम ओरडली. तिनें शंकराकडे पाहिलें आणि पाठ फिरवली. ती झपाझप पावलें टाकून चालूं लागली.

शिवाकडे पाठ फिरवून सती निघाली. ती दक्षयज्ञाकडे तीरासारखी जाऊं लागली.



# सतीची मिरवणूक

सती निघाली. पण ती एकटी कशी जाईल? महेश्वराची सती माहेरीं निघाली तर ती थाटानेंच गेली पाहिजे. वाजतगाजत अशी मिरवणुकीनेंच ती निघाली पाहिजे. महादेवाच्या ऐश्वर्याला शोभेल अशाच तऱ्हेनें ती निघाली पाहिजे. रागानें बेभान झालेल्या त्या सतीच्या हें लक्षांत आलें नाहीं; पण तिनें पुत्रवत् पालन केलेल्या गणांच्या हें लक्षांत आल्याशिवाय कसें राहील ?

शिव-सतीचा वाद-संवाद वाऱ्याबरोबर शिवगणांत पसरला होता. त्यांच्या झुंडीच्या झुंडी तेथें जमा झाल्या होत्या. पण पुढें होण्याचें कोणालाहि धैर्य नव्हतें. आई–बापांच्या भांडणांत मुलांना चोरट्या-सारखें होतें. शिव–सती म्हणजे शिवगणांचीं मातापितरें. त्यांच्या भांडणामुळें शिवगण गोंधळून गेले होते. नंदीहि पुढें येत नव्हते. झाडा–झुडपांच्या आड ते लपले होते. त्यांची छाती धडधडत होती. पुढें काय होणार हें आतुरतेनें ते पहात होते.

सतीच्या दुःखानें ते विव्हळ होत होते. पण शंकराचें म्हणणेंहि त्यांना चूक वाटत नव्हतें. सतीचीं पावलें मागेंपुढें वळत होतीं. त्यावेळीं त्यांचाहि जीव मागेंपुढें होत होता. सती पाय आपटीत निघाली तेव्हां ते दिङ्मूढ झाले. त्यांनीं शिवाला वंदन केलें आणि ते सतीच्या मागून निघाले. सतीनें शिवाकडे पाठ फिरवली तरी शिवगणांनीं तिची पाठ सोडली नव्हती.

सगळे शिवगण त्वरेनें तिच्या मागें गेले. त्यांनीं तिला गांठलें. ‘आम्हीहि यज्ञाला येणार. तुला एकटीला जाऊं देणार नाहीं. आम्हीहि येणार’ शिवगणांनीं हट्ट धरला. त्यांनीं मार्गांत बैठक मारली. सती-भोंवतीं त्यांनीं घेर धरला. सतीची गती मंदावली. शिवगणांची माया पाहून तिचं काळीज गलबललें.

" तुम्ही येणार ? "

" हो सती माता मिरवणुकीनेंच यज्ञमंडपांत जाईल. " नंदिकेश्वर म्हणाला.

" चला तर " सतीनें अनुमोदन दिलें.

मणिमान्, मद वगैरे पार्षद पुढें झाले. यक्ष-किन्नर उभे राहिले. नंदीला त्यांनीं सजवले. त्यांच्या शिंगावर तुरे बांधले. गळ्यांत माळा घातल्या. पाठीवर झूल घातली, गळ्यांत घंटा बांधल्या. सती नंदीवर आरूढ झाली. तिच्या गळ्यांत पुष्पहार पडले, हातांत गजरे घातले. मस्तकावर छत्र धरलें. सतीचा लालबुंद चेहरा सौम्य करण्यासाठींच तें छत्र चांदव्याप्रमाणें तळपत होतें. दोन्ही बाजूंनीं चवऱ्या हालत होत्या. शृंगीनें शिंग वाजविलें आणि मिरवणूक चालूं लागली.



कित्येकानां हातात सुवर्णाचे दंड घेतले आणि ते पुढें चालूं लागले. कोणी मृदंग गळ्यांत अडकवले. कोणी ढोल वाजविण्यास सुरुवात केली.

कित्येकांनीं शंख फुंकले. शिंगें, तुताऱ्या वाजतच होत्या. बांसऱ्यांचाहि सूर निघत होता. वाद्यांचा दणदणाट झाला. आणि त्या तालावर शिवगण पावलें टाकूं लागले. यक्ष–किन्नरांनीं शिवगीत सुरू केलें. मधून मधून एकच गर्जना होत होती, ‘ सती माता की जय ’

शिवगणांबरोबर हिमालयाची वनश्रीच मिरवणुकींत आली होती. कित्येक शिवगणांनीं आम्र बकुल अशा वृक्षांचे पल्लव खुडून घेतले होते. पंचपल्लवांचीं तोरणें उभारून कित्येक भूतगण पुढें चालले होते. अनेक वृक्षांच्या मोहरांचे तुरे प्रमाथी गणांनीं आपल्या जटेंत खोवले होते. वृक्षांचीं आणि वेलींचीं फुलें मिरवणुकींत फुललीं होतीं. सतीचा जयजयकार करतांना शिवगण तिच्यावर पुष्पवृष्टि करीत होते. शिवगणांचा उत्साह उचळत होता.

आणि या उत्साहांत त्यांनीं नृत्य चालविलें होतें. अनेक तऱ्हेचे खेळ ते करीत होते, कोणी उड्या मारीत होते, कोणी कोलांट्या घेत होते. कोणी सती समोर आरसे धरले. आपल्या गळ्यांतल्या कवड्यांच्या माळा कोणी काढल्या आणि पुन्हा घातल्या. अशी वाद्यांच्या गजरांत, नृत्य गीतांच्या तडाख्यांत सतीची मिरवणूक चालूं लागली. सतीहि धुंद झाली.


मिरवणूक निघाली तेव्हां मार्गावरील धुळीचे लोट आकाशांत गेले. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांत मिरवणुकीचे प्रतिध्वनि उमटले. सतीची ही भव्य मिरवणूक शंकरांनीं पाहिली आणि पुन्हां नेत्र मिटले. सती निघाली. तिला आतां अडविण्यांत अर्थ नाहीं. ती इतकी संतप्त झाली आहे कीं, तिला जाऊं दिलें नाहीं तर ती इथेंच देहत्याग करील असें शंकरांना वाटलें. सतीची तळमळ त्यांनीं पाहिली होती. तिच्या देहाची तगमग त्यांना दिसली होती. सतीला थांबविलें तर इथेंच अनर्थ होईल.

पण सती दक्षयज्ञांत गेली तरी अनर्थ टळणार नाहीं, ह हि त्यांना दिसत होतें. उन्मत्त दक्ष तिचा अपमान करील आणि मानी सती तेथें

अनर्थ करील हें चित्र शंकरांना दिसूं लागलें. आणि हे शिवगण धुंद होऊन तिची मिरवणूक काढीत आहेत. सती मोठ्या ऐश्वर्यानें जात आहे. पण पुढें काय होणार, या विचारानें शिव-शंकरांनीं नेत्र मिटले.

इकडे सतीची मिरवणूक चाललीच होती. ज्या वृक्षांच्या सांवलींत ती बसला होती त्यांनीं आपलीं मस्तकें हालवून तिला निरोप दिला. बकुल वृक्षाला रहावेना. त्याच्या डोळ्यांतून टपांटपां आसवें पडलीं. सती ज्या मार्गावरून गेली त्या मार्गावर तीं फुलें होऊन राहिलीं. ज्या डोंगरदऱ्यांत सती फिरली होती त्यांनीं तिला निरोप दिला. त्यांना काय होतें आहे हेंच कळत नव्हतें. मिरवणुकींतील जयघोष ऐकूं आले म्हणजे ते प्रतिध्वनि उमटवीत. जों पर्यंत वाद्यघोष, जयघोष ऐकूं येत होते तोंपर्यंत ते प्रतिसाद देत राहिले!

डोंगर मागें राहिले, दऱ्या संपल्या. कैलासाचें उंचशिखर तेवढेंच दिसत होतें. सतीची मिरवणूक मैदानांत आली. दक्षयज्ञाची भूमी जवळ येत होती. सती अधीर होत होती. दक्षमंदिराचा कळस दिसूं लागला; यज्ञ-मंडपहि आतां नजरेच्या टप्प्यांत आला. सतीला तेथें जाण्याची त्वरा झाली. शिवगणहि जलदीनें पावलें टाकूं लागले. ढोल, ताशे, मृदंग जोरानें वाजूं लागले. तुताऱ्या शिंगें पुन्हा पुन्हा फुंकलीं जाऊं लागलीं. तो नाद दक्षाच्या यज्ञमंडपांत जाऊन धडकला. ‘ सती माता की जय ’ हे घोष अधिक तीव्र होऊं लागले. त्या जयघोषानीं यज्ञ-मंडपांतले वेदघोष अडखळूं लागले. सतीची मिरवणूक यज्ञमंडपाच्या द्वारांत येऊन थडकली.



विभाग
क्रमांक १३
नों. दि.
वाचनालय
शाखा

# सती गेली

यज्ञमंडपासमोर शिवगणांनीं सतीचा जयजयकार केला. सती नंदीवरून खालीं उतरली. आणि धांवतच मंडपांत गेली. सती आली हें तिच्या जयघोषांनीं आधींच तिच्या आईला समजलें होतें. मंडपाच्या द्वारांत सतीला पहातांच प्रसूति धांवत तिच्या स्वागताला पुढें आली. दोघींनीं एकमेकांना घट्ट मिठी मारली. अश्रूंनीं दोघींचेहि पदर भिजून गेले. डोळे पुसून प्रसूतीनें सतीकडे प्रेमानें पाहिलें. सतीच्या अंगावर पुष्पांचे हारगजरे होते; मस्तकावर कुंकुम तिलक आणि भांगांत शेंदूर होता. अंगाला भस्म फांसलेलें होतें. आपल्या मुलीच्या अंगावर सोन्या-मोत्यांचे अलंकार नाहींत हें पाहून प्रसूतीला गहिंवरून आलें !

सतीचे भालदार चोपदार सुद्धां सोन्याच्या काठ्या घेऊन तिच्या पुढें चालतात ! सोन्याच्या मुठींच्या चवऱ्या सतीवर ढाळतात हें प्रसूतीला काय माहित ! भस्माचें वैभव तिला कुठून ठाऊक असणार ! सतीच्या अंगावर रत्नांचे अलंकार नाहींत हें पाहून तिचें मातृहृदय गलबललें. तिनें आपल्या हातांतील रत्नकंकणें काढलीं आणि सतीच्या हातांत घातलीं. मग तिला समाधान वाटलें. सतीच्या पाठीवर तिनें मायेनें हात फिरवला आणि तिला घेऊन प्रसूति आंत आली.

सतीच्या बहिणी तिच्या भोंवतीं जमल्या. त्या सुखदुःखाच्या गोष्टी बोलूं लागल्या. प्रेमाचा हा पहिला भर हळूहळू ओसरला. आतांपर्यंत सतीला आपली आई दिसत होती. आपल्या बहिणी दिसत होत्या. तो यज्ञमंडप ती विसरूनच गेली होती. पण हळूहळू ती भानावर आली आणि यज्ञमंडपांतील वातावरण तिला जाणवूं लागलें.

यज्ञमंडपांत वेदघोष चालला होता. ऋषी आणि आचार्य स्वाहाकार करीत होते. यज्ञकुंडांतून अग्नीच्या ज्वाळा लळलळत होत्या; त्या

थोड्याशा भयंकर दिसत होत्या. पलिकडे मेंढे, बैल असे यज्ञीय पशू बांधलेले होते. त्यांचा करुण आवाज वेदघोषांत लुप्त होत होता. वातावरण गंभीर होतें. ऋषींचा मंत्रघोष त्यापेक्षांहि गंभीर वाणीनें चालू होता. सतीचें मन या वातावरणानें भरून गेलें. तिचें मन उचलल्यासारखें झालें. तिनें यज्ञमंडपांत नजर टाकली.

तेथें निरनिराळ्या उच्च आसनांवर देव आरूढ झाले होते. ऋषीमुनी बसले होते. सर्वत्र यज्ञपात्रें पसरलीं होतीं. सुवर्णाचीं आणि मृतिकेचीं, लोखंडाचीं आणि चामड्याचीं, लांकडाचीं आणि दर्भाचीं अशी पात्रें ठिकठिकाणीं दिसत होतीं. दर्भ आणि समिधांचे ढीग दिसत होते. घृत आणि मध यांचे कुंभ तेथें होते. त्यांतून तूप आणि मध काढून पात्रांत घेतला जात होता आणि त्यांच्या आहुति अग्नीमध्यें दिल्या जात होत्या. यज्ञकुंडांत घृताच्या धारा पडत होत्या आणि धूर बाहेर पडत होता. सर्वत्र धूम्राचीं वलयें पसरत आहेत असें सतीला दिसलें. कर्ममार्गावरच हा धूर पसरत आहे असें तिला वाटलें. यज्ञमंडपांतील वातावरण तिला अधिकाधिक भीषण वाटूं लागलें.

सती यज्ञमंडपांत आली त्यावेळीं तिला हें वातावरण दिसलें नव्हतें; तिला फक्त तिची आईच दिसली होती. आतां तिला हें वातावरण स्वच्छ दिसूं लागलें आणि तिच्या मनांतील आईची मूर्ति विरळ होऊं लागली. आपण मंडपांत प्रवेश केला त्यावेळीं दक्षपित्यानें आपल्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं असें तिला वाटूं लागलें आणि आतां तरी तिच्याकडे कोण लक्ष देत होतें? अजूनहि दक्षाचें आपल्याकडे लक्ष नाहीं; त्याच्याभोंवतीं बसलेले देव, ऋषी, मुनी कोणीहि आपली दखल घेऊं इच्छित नाहींत हें ती समजून चुकली. कोणी बसल्याजागीं चुळबुळ करीत आहे; कोणी पाहून न पाहिल्यासारखें करीत आहे; कोणी मंत्र म्हणतांना त्यांतच तल्लीन झाल्यासारखें दाखवून डोळे मिटीत आहे; तर कोणी धुराचें निमित्त करून डोळ्यांवर हात धरात

आहे; कोणी आपसांत बोलत बोलत आपल्याकडे कानाडोळा करीत आहे, अशी सभाजनांची हालचाल सतीनें एका दृष्टिक्षेपांत ओळखली.

यज्ञाचा यजमान दक्ष हा स्वतःच आपल्या कन्येचा अधिक्षेप करून राहिला होता. मग इतरांना तिचा सत्कार करण्यासाठीं इच्छा कां होईल ? कोणाला तसें करावेसें वाटलें तरी तेवढें धैर्य त्याला कोठून होणार ? सतीनें त्या सर्वांकडे एकदां तुच्छतेनें पाहिलें. आणि मग तिच्या नजरेसमोर शिवशंकराची मूर्ति दिसूं लागली. " नको सती ! तूं दक्ष-यज्ञांत जाऊं नकोस,' असें ती मूर्ति आर्त स्वरांत सांगत होती. प्रथम तिला शंकराचें हास्यवदन दिसलें. पण शंकराच्या मुद्रेवरचे भाव भराभर बदलत आहेत, तो आपली समजूत घालीत आहे, आपले आर्जव करीत आहे असें तिला दिसूं लागलें. ' हट्ट सोड. सती, दक्ष-यज्ञाला जाण्याचा हट्ट सोड. ' शंकराचें हे गंभीर स्वर तिच्या कानांत घुमूं लागले. तिला आपला हट्ट आठवला; आपली समजूत घालतांना शंकराची व्याकुळता दिसली; त्यानें दिलेला निर्वाणीचा इशारा ऐकूं येऊं लागला.

आणि मग यज्ञमंडपांतलें तें दृश्य तिला असह्य झालें. आपल्या अपमानानें ती बेभान झाली. ' नाही ! ' अशी एकच दीर्घ आरोळी तिच्या मुखांतून बाहेर पडली. ती एकदम उभी राहिली आणि सारी सभा दचकली. पण याच वेळीं मंडपाबाहेर कल्लोळ चालला होता. मंडपांत निःशब्द शांतता पसरली तेव्हां सतीला बाहेरचा कल्लोळ स्पष्ट ऐकूं आला. बाहेरचें दृश्य कल्पनेनेंच तिला स्वच्छ दिसूं लागलें. जें आंत झालें तेंच बाहेर घडलें असणार ! तिनें सभाजनांकडे पुन्हां एकदां तुच्छतेनें पाहिलें. दक्षाकडे एकदां क्रोधाचा कटाक्ष टाकला, त्यावेळीं तिच्या डोळ्यांतून आग ओसंडते आहे कीं काय असेंच वाटलें. सतीनें मोहरा फिरविला आणि ती मंडपाबाहेर आली.

‘आम्ही सूड घेऊं; यज्ञ विध्वंस करूं’ तिला पहातांच शिवगणांनीं एकत्र गर्जना केली. त्या शिवगणांचा अपमान झाला होता. त्यांना कोणी या म्हटलें नव्हतें, कोणी बसा म्हटलें नव्हतें. दक्षाचे सेवक त्यांच्याकडे अवहेलनेनें पहात होतें. सतीच्या कपाळाची शीर उडाली. ‘सतीचा अपमान तो शिवाचा अपमान! आम्ही याचा सूड घेऊं,’ शिवगणांनीं पुन्हां गर्जना केल्या. समुद्राला लाटा याव्या तसे ते उंचावत होते, पुढें सरकत होते. त्यांना आपल्या मानापमानाची पर्वा नव्हती. सतीचा अपमान झाला म्हणून ते खवळले होते. शिवगणांचें प्रेम आणि अभिमान पाहून सतीचा ऊर भरून आला. पण सूडाच्या गर्जना वाढत होत्या. सतीनें हात उंच केले. सर्वत्र शांतता पसरली. ‘जो अपमान तुम्हांला समजतो, तो मलाहि समजतो शंकराच्या अपमानाचा सूड मी घेईन. तुम्ही शांत रहा. मी सूड घेईन.’ सतीचे हे शब्द हवेंत विरले नाहींत तोंच शिवगणांनीं पुन्हां गर्जना केली, ‘सती माता की जय!’

सतीनें गिरकी घेतली आणि ती यज्ञमंडपांत दक्षासमोर येऊन कधीं उभी राहिली हें कोणाला कळलेंहि नाहीं’ तिच्या नेत्रांतून क्रोधाच्या ठिणग्या पडत होत्या; संतापानें ती थरथरत होती; तिचा भडका उडाला होता. प्रथम तिच्या तोंडून शब्दच बाहेर फुटेना. पण अन्तःकरणांत अंगार फुलला होता. जेव्हां ती बोलूं लागली तेव्हां नुसत्या लाह्या उडूं लागल्या.

‘दक्षा, तूं माझा पिता आहेस!’ वीज कडाडावी त्याप्रमाणें सतीच्या तोंडून शब्द बाहेर फुटले. दक्ष क्षणमात्र दचकला. यज्ञांत आहुति देण्यासाठीं पुढें झालेला त्याचा हात एकदम मागें आला. पण त्यानें तो पुढें केला. आणि यज्ञांत आहुति टाकलीच.

‘सती, मी तुझा पिता झालों याचा आतां मला अभिमान वाटत नाहीं.’ दक्षानें उत्तर दिलें, पण वर पाहिलें नाहीं.

'आणि मी तुझी कन्या झालें हें मलाहि माझें दुर्भाग्य वाटतें. ज्ञानी शिवाचा द्वेष करणारा तूं माझा पिता आहेस ही गोष्ट मला अमंगल वाटते. कल्याणकारी शंकराचा अपमान करणारा दुष्ट दक्ष हा माझा पिता झाला हें माझें दुर्दैव आहे. ज्या यज्ञांत शिव नाहीं...'

'त्या यज्ञांत तूं कां आलीस? मी तुला आमंत्रण दिलें नव्हतें. शंकराला बोलावलें नव्हतें. भूतपतीला मी यज्ञभाग देणार नाहीं.':

'तो यज्ञ सिद्धीलाच जाणार नाहीं. शंकर जेथें नाहीं तो यज्ञमंडप स्मशानवत् आहे.'

'मग स्मशानवासी शंकराला सोडून तूं येथें कां आलीस?'


'तुझ्या यज्ञाचा विध्वंस करण्यासाठीं!'

सतीचे हे शब्द ऐकून दक्ष तुच्छतेनें हंसला. यज्ञांतील अग्निज्वाले-प्रमाणें थरथरणाऱ्या सतीकडे न पहातां तो यज्ञकुंडांत आहुति देत होता. यज्ञकुंडांतून ज्वाला भडकत होत्या.

सतीचे शब्द संपले नव्हते. ती म्हणाली, 'मी आलें याचें कारण मला तुझ्या दुष्टपणाचा सूड घ्यायचा आहे. शंकराच्या अपमानाचा सूड घ्यायचा आहे. मी दक्षकन्या सती नाहीं; मी शिवपत्नी सती आहे. तूं मूढ आहेस, शिव ज्ञानी आहे. तुझें ऐश्वर्य दरिद्रि आहे, शंकराचें वैराग्य वैभवशाली आहे. विश्वाच्या दुःखाचें भस्म करून तें तें त्यानें आपल्या अंगाला फांसलें आहे. म्हणून शंकराच्या चरणावरचें निर्माल्य सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवानेंहि आपल्या शिरावर धारण केलें; त्या सदाशिवाची मी सती आहें. पण मी तुझी कन्या आहे हेंच माझें दूषण आहे.

'शिवशंकर जेव्हां दाक्षायणी असें मला प्रेमानें म्हणतो त्यावेळीं तुझ्या नांवाचा स्पर्श होऊन मला चटके बसतात. तुझ्यापासून निर्माण झालेला हा अपवित्र देह मला नको. त्याचा मी आतां त्याग करणार

तुझ्यासमोर हा देह टाकीन. शिवशंकराशीं एकरूप होण्यासाठीं मी दुसरा जन्म घेईन आणि नव्या पवित्र देहानें त्याचें दर्शन घेईन. दुष्ट दक्षापासून प्राप्त झालेला देह मी टाकून देणार. तुझ्या यज्ञांतच आतां या देहाची मी आहुति टाकतें.'



सती बोलत होती. तिच्याकडे दुर्लक्ष करून दक्षाचें यज्ञ–कार्य चालू होतें. सारे देव, ऋषि, मुनि आणि इतर सभाजन दिङ्मूढ होऊन पहात होते. सतीच्या आवेशानें ते भेदरले होते. दक्षाच्या पाषाणी अन्तःकरणाखालीं ते दडपून गेले होते. सती तशीच तेथें त्या यज्ञकुंडासमोर आसन घालून बसली. तिनें उत्तरेकडे तोंड केलें; आचमन करून मौन धारण केलें. आणि तिनें योगसमाधींत प्रवेश केला. सती शंकराची प्रिय पत्नी होती; अर्धांगी होती. महादेवाचा योगमार्ग तिला माहीत होता. षट्चक्रांचा भेद करून तिनें प्राण ब्रह्मांडीं नेला. शंकराच्या चरणकमलांचें चिंतन ती करूं लागली. तिचें अन्तःकरण शिवमय

झालें. दृष्टिशून्य झाली. समाधियोगानें तिच्या शरीरांत अग्नि उत्पन्न झाला. आणि दक्षापासून निर्माण झालेला देह जळूं लागला. यज्ञकुंडावर ती धाडदिशीं पडली.

सती गेली; पृथ्वी हादरून गेली. विजेचा झटका बसावा तसे सारे सभाजन दचकले. त्यांनीं हाहाःकार केला. दक्षाच्या दुष्टपणाबद्दल तिरस्कार त्यांच्या वाणींतून आपोआप बाहेर पडला. पण दक्ष एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें निश्चल होता. शिव द्वेषानें निर्माण झालेला अनर्थ पाहूनहि त्याला पाझर फुटला नव्हता. असें तें भयानक दृश्य होतें. यज्ञकुंडांतून धूर निघत होता. सभागृह धुरानें कोंडून जात होतें. त्यामुळें तें दृश्य अधिकच भीषण झालें.



# शिवगणांचा पराभव

सतीनें देह ठेवला ही वार्ता बाहेर शिवगणांना समजली तेव्हां त्यांच्यावर वज्राघात झाला. त्यांची बुद्धि सुन्न झाली. दुःखातिरेकानें ते दिङ्मूढ झाले. सतीमाता अपमानाचा सूड घेईल याबद्दल त्यांना शंका नव्हती. पण सूडाचा हा अकल्पित प्रकार त्यांच्या कल्पनेलाहि शिवला नव्हता. त्यामुळें सती गेली हें ऐकून ते मटकन् खालींच बसले. दुःखाचा उमाळा एवढा जबरदस्त होता कीं, पहिल्या क्षणांत त्यांना क्रोधहि आला नाहीं.

दुःखाचा पहिला आवेग ओसरला आणि त्यांचा शोक क्रोधरूप होऊं लागला. त्यांना शिवशंकराचें स्मरण झालें. सती गेली. आतां आपण शिवाचें दर्शन कोणत्या तोंडानें घ्यायचें ? ' ज्या दक्षामुळें हा अनर्थ कोसळला त्याचा नाश करूं; यज्ञाचा विध्वंस करूं ' या विचाराची ठिणगी त्यांच्या मनांत पडली. ते संतापानें पेटूं लागले. ' यज्ञाचा विध्वंस करूं; दक्षाचा सूड घेऊं ' एका शिवगणानें आरोळी ठोकली; अनंत कंठांनीं सूडाच्या गर्जना झाल्या; मुठी वळल्या आणि शिवगणांनीं मंडपावर हल्ला केला.

पण शिवगण मंडपांत प्रवेश करूं शकले नाहींत. कारण यज्ञ-मंडपाच्या रक्षणाची यावेळीं कडेकोट व्यवस्था झालेली होती. भृगुऋषीनें पुढचा प्रसंग ओळखला होता. दक्षाच्या आज्ञेनें देव-सैन्य शिवगणांवर हल्ला करण्यासाठीं सज्ज होऊन बाहेर पडलें होतें. शिवगणांना तोंड देण्यास तें देव-सैन्य तयार होतें. शिवगण पुढें सरलें. त्यांचीं डोकीं या देवसैन्याच्या भिंतीवर आपटलीं. देवसैन्यानेंच उलट शिवगणांवर हल्ला चढविला. शिवगणांना हा हल्ला अनपेक्षित होता.

शिवगणांकडे त्वेष होता, शरीरसामर्थ्य होतें पण देवसैन्याकडे शस्त्रास्त्रें होतीं. त्यामुळें पहिल्या हल्ल्यांत देवसैन्यानें शिवगणांना मागें

रेटलें. पण या माघारीनें शिवगणांचा त्वेष अधिकच भडकला. त्यांनीं देवांचीं शस्त्रास्त्रें न जुमानतां मुसंडी मारण्यास प्रारंभ केला. त्यांची धडक देवांना असह्य झाली. त्यांच्या हातांत शस्त्रें होतीं. पण हृदयांत आवेश नव्हता. त्यांचीं शस्त्रें लटपटूं लागलीं; देवसैन्य कच खात आहे असें दिसतांच शिवगणांचा आवेश वाढूं लागला. ते दुप्पट आवेशानें पुढें घुसूं लागले देवसैन्यांचीं शस्त्रें त्यांनीं त्यांच्यावरच उलटविलीं. आवेशानें, त्वेषानें शस्त्रास्त्रांवर मात केली. देवसैन्यांची धुळदाण झाली. शिवगणांच्या गर्जनांनीं आसमंतांत दणाणून गेलें. त्यांच्या जयघोषांनीं यज्ञमंडप थरारून गेला.

देवसैन्य पराभूत झालें आणि शिवगण सूडाच्या गर्जना करीत मंडपाच्या द्वारावर गर्जना करूं लागले, हें पाहतांच सभाजनांचें धाबें दणाणलें. ऋषिमुनींच्या तोंडचें पाणी पळालें. यज्ञदिक्षा घेतलेल्या दक्षाच्या मनाची चलबिचल झाली. त्यांच्यासमोर सतीनें प्राणत्याग केला होता; त्या सतीचें निष्प्राण कलेवर त्याच्यासमोरच होतें. पण हें सगळें घडलें त्यावेळीं त्याचें चित्त चल पावलें नव्हतें. पण आतां त्याच्या यज्ञाचाच विध्वंस होण्याची पाळी आली होती. त्यामुळें तो विचलित झाला. दक्षानें भृगु ऋषींकडे पाहिलें.


प्रसंग मोठा बांका होता. आणि विचार करण्यास अवधि नव्हता. पण तत्क्षणीं वीज चमकावी तशी भृगुऋषींना कल्पना स्फुरली. त्या कल्पनेचा आनंद त्यांच्या मुखावर झळकला. यजुर्वेद मंत्रांनीं त्यांनीं यज्ञांत अवदानें देण्यास प्रारंभ केला. आपल्या मंत्रसामर्थ्यानें त्यांनीं ऋभूंना आवाहन केलें. मंडपाच्या द्वारांतून शिवगण आंत घुसत होते. मंडपांत कल्लोळ माजूं लागला होता. इतक्यांत भृगू ऋषींचा मंत्र सिद्ध झाला. यज्ञकुंडांतून ज्वाला बाहेर आल्या. अग्नींतून ऋभू देव प्रगट झाले. ते ऋभू अग्नीसारखेच तेजस्वी होते. त्यांचीं वस्त्रें अग्निवर्णाचीं होतीं.

आणि शस्त्रेंहि अग्नीसारखींच होतीं. ऋभूंना पूर्वी सोमपानाचा अधिकार नव्हता. तो अधिकार त्यांना भृगू ऋषीनें दिला होता. त्यामुळें भृगूनें त्यांना मंत्रबद्ध केलें होतें. भृगूनें आवाहन करतांच ते प्रकट झाले आणि त्यांनीं शिवगणांवर झेंप टाकली.

ऋभू देव शिवगणांना भिडले आणि त्यांनीं केलेल्या शस्त्रप्रहारांबरोबर ठिणग्या पडूं लागल्या. शिवगणांचे प्रहार त्यांना जणूं लागतच नव्हते. शिवगण मात्र भाजून निघत होते. शिवगण बेहोष झालेले होते; ऋभूदेवहि बेहोषच होते. त्यांच्या अग्निवर्षावानें शिवगणांचा आवेश भाजून निघाला. त्यांचा निश्चय करपून निघाला. वणवा पेटून अरण्यांतले वृक्ष कडाकड मोडून खालीं पडत होते. शिवगण आटूं लागले. ते मागें रेंटले जाऊं लागले.

ऋभूंनीं दक्षयज्ञाचा जयजयकार केला. मंडपांतील कोलाहल शांत झाला आणि तेथें त्या जयजयकाराचे प्रतिध्वनी घुमले. शिवगणांचा निःपात झाला आणि यज्ञमंडपांत पऱ्हां मंत्रघोष सुरू झाला. भृगुऋषी कृतार्थ झाले; त्यांनीं धन्यवाद दिले.

ऋभूंचें कार्य झालें; ते जसे प्रकट झाले होते तसेच गुप्त झाले. दक्षयज्ञावरचें संकट टळलें. सतीचा देह तेथेंच होता. यज्ञ थांबवून त्या देहाची व्यवस्था कोण लावणार? तो तेथेंच व्यवस्थेनें ठेवण्यांत आला. दक्षयज्ञांतील विघ्न टळलें असें सर्वांना वाटलें आणि तो यज्ञ पुढें चालू झाला.



# शिवाचा क्रोध : वीरभद्र

दक्ष यज्ञांतील ही भीषण वार्ता अजून कैलासावर पोंचली नव्हती. शिवशंकर ध्यानमग्न होते. सती हट्टानें यज्ञाला गेली याचा त्यांना खेद झाला होता. सतीच्या हट्टाचा परिणाम चांगला होणार नाहीं हें त्यांना दिसतच होतें. सती आपल्या शब्दासाठीं अर्ध्या वाटेंतून परत फिरेल, असें त्यांना एकदां वाटे. पण दाक्षायणीचा हट्ट त्यांना ठाऊक होता. शिवगणांनीं त्यांच्या समोरच तिला मिरवीत नेलें होतें. सतीचे जय-घोष कैलासाच्या पहाडांत विरले तरी शिवशंकराच्या कानांत अजून निनादतच होते. म्हणून त्यांनीं नेत्र मिटले. मन निर्विकल्प केलें आणि समाधि लावली.

शंकराची ही समाधि अनंत काळ टिकली असती. पण गंभीर वीणानादानें ते किंचित् भानावर आले. त्यांनीं डोळे उघडले तेव्हां समोर नारदाचें नाम-संकीर्तन चाललें होतें. पण नेहमींप्रमाणें नारदाच्या मुखावर प्रसन्नता नव्हती, मिस्कील हास्यहि नव्हतें. महादेवाला सतीचें स्मरण झालें. दक्षयज्ञाची वार्ता नारदाकडून कळेल, पण त्यामुळेंच तर त्याच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता नष्ट झालेली नाहीं ना, असेंहि शंकराला वाटलें. नारदानें त्यांना वंदन केलें.

'भक्तिमान् भव !' आशीर्वाद देत शंकर म्हणाले, 'नारदा, तुझें मुख असें म्लान कां दिसतें आहे ? दक्षयज्ञाची कांहीं वार्ता समजली आहे का तुला ? सती– '

'सती गेली हें कोणी सांगितलें तुम्हाला ? '

'सती गेली ? काय म्हणतोस तूं हें ? सती इथून दक्षयज्ञाला गेली एवढेंच मला माहित आहे. '

'सती दक्षयज्ञांतूनहि पुढें गेली. ती आतां परतण्याची आशा नाहीं, कैलासपते, हें मी कोणत्या तोंडानें सांगूं ? ' नारद खिन्नपणें म्हणाला.

' सांग, सांग. नारदा, सतीचें काय झालें ? ती कुठें गेली ? हा मी तिच्या शोधासाठीं निघालों. बोल, बोल !' शंकर अधीरपणें उभे राहिले.

' महादेव, आतां शोधूनहि ती तुम्हाला गवसणार नाहीं. तिनें देहत्याग केला. दक्षयज्ञांत अपमान झाल्यामुळें त्या मानी सतीनें योगाग्नी पेटवून आपले प्राण सोडले. '

' नारदाचे हे शब्द ऐकतांच शंकर मटकन् खालीं बसले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. दुःखानें कंठ दाटून आला. त्यांतून शब्द फुटेना. ते दीर्घ निश्वास टाकूं लागले. कैलासाचें शिखरच खचल्यासारखें दिसूं लागलें !

नारद सांगत होता, ' सती गेली आणि त्याच मार्गानें शिवगणहि गेले. आपल्या अपमानाचा सूड घेण्यासाठीं सतीनें देहत्याग केला. आणि दक्षयज्ञाचा विध्वंस करतांना शिवगण कामाला आले. त्यांनीं पराक्रमाची शर्थ केली. पण ऋभु देवांच्या असंख्य सैन्यानें त्यांची दाणादाण केली. ' नारदाचीं हीं वाक्यें ऐकतांना शिवशंकराची मुद्रा पालटत होती. शोकाच्या जागीं क्रोध जमा होत होता. ' शिवगणांची दाणादाण झाली ' हें ऐकतांच शंकर क्रोधानें उफाळले.

ते एकदम उभा राहिले आणि त्यांचा जटाभार विस्कटून गेला. त्यांच्या डोळ्यांतून ठिणग्या पडूं लागल्या. ते आवेशानें दांतओंठ चावूं लागले. त्यांनीं डावा पाय जोरानें भूमीवर आदळला आणि प्रचंड सिंहनाद केला. कैलास थरारून गेला; सिंहनादानें आकाश कोसळून पडेल कीं काय असें वाटूं लागलें. भूतनाथाचें तें भयानक उग्र स्वरूप पाहून कैलासावरील सारे शिवगणहि क्षोभ पावले आणि तेथें गोळा होऊं लागले.

सतीच्या देहत्यागाचा सूड, शिवगणांच्या पराभवाचा सूड, दक्षयज्ञाचा विध्वंस, सगळें वातावरण सूडाच्या इच्छेनें पेटूं लागलें. महारुद्र

खवळला होता. मध्येंच तो अट्टाहास करी, मध्येंच तिरस्कारानें भयानक हास्य करी. विस्कटलेल्या जटांना त्याचे हात हिसके देत होते. शंकरानें विद्युलतेप्रमाणें आपली एक जटा क्रोधानें उपटली आणि क्रोधानें गर्जना करीत समोरच्या शिळेवर आपटली. भयंकर आवाज झाला. आणि त्या जटेंतून एक विक्राळ पुरुष निर्माण झाला.

शिवशंकराचा तो मूर्तिमंत क्रोध होता. त्याची अंगकांति मेघाप्रमाणें काळी होती. त्याचें मस्तक आकाशाला टेंकलें आहे असें वाटत होतें. त्याच्या दाढा भयंकर दिसत होत्या. जीभ लळलळत होती. एका हातांत त्रिशूळ घेऊन दुसऱ्या हातानें तो आपल्या केंसाच्या जटा



कुरवाळीत होता. त्याचे नेत्र भडकलेल्या अग्नीप्रमाणें दिसत होते. नेत्र आणि गळ्यांत नरकपाळांच्या माळा यामुळें तो प्रतिरुद्रच दिसत होता.


क्षणांत त्याला सहस्रावधि हात आहेत. आणि ते शस्त्रास्त्रांनीं सज्ज आहेत असें वाटे. तो क्रोध-पुरुष विकट हास्य करून शंकरापुढें नम्र झाला. " भूतनाथ, मी कोणतें कार्य करूं ? आज्ञा द्या. त्या पुरुषानें शिवाची प्रार्थना केली. '

आपल्या क्रोधानें निर्माण झालेला तो विक्राळ पुरुष नम्र झालेला पहातांच शंकर शांत झाले, प्रसन्न झालें भोंवतीं शिवगण सूडाच्या आवेशांत क्षुब्ध होऊन राहिले होते. पण शंकर शांत होते. त्यांनीं शिवगणांवर दृष्टि फिरवून त्या क्रोध-पुरुषाला म्हटलें, " वीरभद्रा, तूं या भूतगणांचा सेनापती हो. माझ्या क्रोधाची तूं मूर्ति आहेस. जा; आणि दक्ष-यज्ञाचा विध्वंस कर. दक्ष-प्रजापतीचा वध-कर. सतीच्या देहत्यागाचा सूड घे. जा. विजयी हो. "

शंकराची गंभीर आज्ञा गिरीकंदरांत घुमली. वीरभद्रानें शिवाला पुन्हा वंदन केलें. आणि विक्राळ गर्जना केली. प्रक्षुब्ध झालेल्या शिवगणांनीं त्याला साथ दिली. ते भयानक आरोळ्या ठोकीत त्याच्या भोंवतीं जमले. रुद्राला प्रदक्षिणा घालून ते वीरभद्राच्या मागें जाऊं लागले. खवळलेल्या नदीचा प्रवाह डोंगर कड्यावरून उड्या घेत जावा तसा शिवसेनेचा ओघ गर्जना करीत कैलासावरून खालीं उतरूं लागला. कैलासहि क्षुब्ध झाला होता. त्यानें वीरभद्राच्या सेनेला प्रतिध्वनी उमटवून उत्तेजन दिलें. वृक्षांनीं त्यांच्यावर रक्त पुष्पांचा वर्षाव केला. लाल धुळीचा गुलाल आकाशांत उधळत होता. कैलासावरच्या वाऱ्यानें तो एखाद्या ध्वजासारखा वीरभद्राच्या सेनेपुढें लोटून दिला.

नारदानें केव्हांच प्रयाण केलें होतें. वीरभद्राची सेना मोठ्या वेगानें दक्षयज्ञाकडे निघाली. होती. शंकरानें ती मिरवणूक पाहिली. अशीच त्यानें सतीची मिरवणूक पाहिली होती. त्यावेळीं आनंदानें

बेहोष झालेल्या शिवगणांना पाहून शंकरांना विषाद वाटला होता. आज सूडानें बेहोष झालेल्या शिवगणांना त्याच मार्गानें जातांना पाहून शंकर गंभीर झाले. दक्षाच्या कर्माचें हें फळ आहे असें म्हणून त्यांनीं पुन्हा नेत्र झांकून घेतले. शंकर ध्यानमग्न झाले. शिवगणांनीं ठोकलेल्या सूडाच्या आरोळ्या दूर दूर ऐकूं येऊं लागल्या. कारण वीरभद्र आपल्या सैन्यासह दक्षयज्ञाच्या निकट येत होता.



# दक्षयज्ञ विध्वंस

वीरभद्रापूर्वी त्याच्या भूतगणांच्या धांवण्यामुळें उडालेली धूळच दक्षयज्ञाच्या मंडपाकडे आली. उत्तरेकडे उडणाऱ्या धुरोळ्यानें दिशा धुंद झाल्या होत्या. आणि त्यानें यज्ञमंडपांतील सभाजन चकित झाले. हा अंधःकार कसला ? हा धुरोळा कुठून येत आहे ? हें अरिष्टच आहे असें सभाजनांना वाटूं लागलें; स्त्रियांचीं काळजें धडधडूं लागलीं. सतीच्या देहत्यागानें त्या आधींच कावऱ्याबावऱ्या झाल्या होत्या. शिवगणांनीं त्यानंतर उडविलेला अनर्थ त्यांनीं पाहिला होता. आणि त्यांतूनच हें नवें संकट उत्पन्न झालें असलें पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें. आणि सभाजनांनाहि तसेंच वाटत होतें. कारण महेश्वराचें सतीवर किती प्रेम आहे हें त्यांना माहित होतें; आणि त्या रुद्राचा कोप किती प्रलयंकारी आहे हेंहि त्यांना ठाऊक होतें. म्हणूनच दक्षानें सतीचा अपमान केला हें त्यांना आवडलें नव्हतें; सतीनें आत्मयज्ञ केला तेव्हां त्यांचें काळीज चरकलें होतें. पहिलें संकट ऋभु देवांनीं निवारण केलें. पण आतां दुसरें अरिष्ट ओढवले तर ? त्यांच्या हृदयाचा थरकांप झाला.

आणि ते धुळीचे ढग आतां यज्ञ-मंडपापर्यंत पसरत होते. सूर्यप्रकाश असतांनाहि अंधःकार पसरूं पहात होता. गगनभेदी आरोळ्या कानांत शिरूं लागल्या होत्या. यज्ञसभेंत गोंधळ निर्माण होत होता. स्थीर आणि ठाम होता तो दक्षप्रजापति आणि त्याचे भृगुऋषींसारखे पाठिराखे. त्यांचा मंत्रघोष तसाच चालला होता, यज्ञांत आहुति टाकण्याचा त्यांचा क्रम अखंड चालू होता. पण त्यांच्या क्रिया यांत्रिकपणें चालल्या होत्या; त्यांचेंहि चित्त थाऱ्यावर नसावें. कारण मध्येंच ते त्रासिकपणें सभेंतल्या गलबल्याकडे दृष्टि टाकीत. पण तो गलबला कमी होत नव्हता

आंतला गलबला कमी होत नव्हता; कारण बाहेरचा गोंधळ वाढत होता. वीरभद्राचें सैन्य मंडपाबाहेर येऊन थडकलें होतें. त्यांच्या आरोळ्यांनींच मंडप उडून जाईल कीं काय असें वाटूं लागलें. प्रलयकालीं प्रचंड दिग्गजांना आपल्या त्रिशूलानें टोंचून धरणारा आणि मेघगर्जनेला लाजविणाऱ्या प्रचंड अट्टाहासानें दशदिशांचे तुकडे करणारा प्रलयरुद्रच बाहेर अवतरला आहे कीं काय असें वाटूं लागलें. पण आतां वाटण्यालाहि अवकाश नव्हता. वीरभद्रानें यज्ञमंडपांत उडी मारली होती. भूत, पिशाच्च, प्रमाथी, पार्षद, अशा शिवगणांनीं यज्ञमंडप घेरला होता. ऋभुदेवांपुढें पराभूत होऊन गेलेले नंदिकेश्वरा-सारखे शिवगण यावेळीं दुप्पट आवेशानें वीरभद्राबरोबर पुढें सरसावत होते.

वीरभद्रानें यज्ञमंडपांत उडी टाकतांच सर्वत्र कोलाहल माजला. वीरभद्राचें भयानक स्वरूप पाहूनच दक्षप्रजापति तटस्थ झाला. भृगुऋषीहि असेच गोंधळून गेले. ऋभुदेवांना आवाहन करण्यासाठीं अथर्व मंत्रांनीं अग्नींत अवदान द्यावें हेंहि त्यांना सुचलें नाहीं. आणि यावेळीं शिवगणांपुढें त्या ऋभूंचा तरी काय पाड लागणार होता ! शिवगणांचें स्वरूप यावेळीं जितकें उग्र होतें तितकींच त्यांचीं शस्त्रास्त्रें भयानक होतीं, वीरभद्राच्या सेनासागरांत ऋभु बुडून गेले असते ! त्यांचीं अग्नीप्रमाणें प्रदीप्त दिसणारीं शस्त्रें विझून गेलीं असतीं. विश्वांतील सर्व हिंस्र श्वापदें आणि विद्रूप पशु यांचे भयानक आकार शिवगणांनीं धारण केले होते. त्यांना पाहून सभाजन गलितधैर्य झाले.

पण शिगवणांना त्यांच्या धैर्याची पर्वाच नव्हती. वीरभद्रामागून ते यज्ञमंडपांत घुसले आणि त्यांनीं विध्वंस करण्याचा तडाखा लावला. मंडपाचा एक एक भाग ते जमीनदोस्त करीत होते. स्त्रियांचा बसण्याचा

मंडप मोडला, आग्नीध्रशाला, पाकशाला यांचा सत्यानाश झाला,— मंडपाचे कळस केव्हांच कापले होते. तो मंडपच खालीं येत होता; आणि खालच्या कोलाहलांत भर घालीत होता.

जी स्थिति यज्ञमंडपाची तीच यज्ञाची. यज्ञपात्रें शिवगणांनीं फोडून टाकलीं. कांहींनीं उत्तरवेदीचीं सीमासूत्रें तोडून टाकलीं, यज्ञवेदी मोडून टाकली, अग्नीकुंडांना ठोकरी दिल्या, अग्नी उधळून दिला. ऋषी, मुनी, इतकेंच नव्हे तर देवगण यांचीहि हा अनर्थ पाहून पळापळ सुरू झाली. पण त्यांना पळून जाणेंहि शक्य नव्हतें. सतीच्या छळाचें प्रायश्चित्त भोगल्याशिवाय त्यांची सुटका नव्हती. ऋषींना बुक्क्या मिळाल्या, मुनींना ठोसे मिळाले, देवांच्या विटंबनेला तर पारावारच नव्हता. पण ही सारी शिवगणांच्या दृष्टीनें किरकोळ मंडळी होती.

दक्षयज्ञाचे नेते, ऋत्विज यांच्यावर त्यांचा खरा रोख होता. म्हणून शिवगणांचे अधिपति गर्जना करीत त्यांच्या अंगावर धांवून गेले. वीरभद्रानें प्रचंड आरोळी ठोकून दक्षप्रजापतीच्या अंगावर उडी मारली. आणि त्याला उताणा पाडून तो त्याच्या छातीवर उभा राहिला. वीरभद्राचें अनुकरण इतर प्रमुख गणांनीं त्वरित केलें. मणिमान या गणानें भृगु ऋषींची मानगुट पकडली. चंडीशानें पूषा देवाला पालथें पाडलें; नंदिकेश्वरानें भग देवाला आपल्या तोंडांतच धरलें! आणि मग सूड घेण्यास सुरुवात झाली. मणिमानानें मानगुट पकडली. तेव्हां भृगुऋषी हातांत स्रुवा घेऊन होम करीत होते. त्याना पहातांच वीरभद्रानें दक्षाच्या छातीवरून त्यांच्याकडे उडी मारली आणि त्यांच्या दाढी मिशा उपटून अग्नींत फेंकून दिल्या. नंदिकेश्वरानें भगाला तोंडांतून खालीं फेंकलें आणि भृगुऋषीचा कान पकडून बजावलें, ' दुष्टा, याच दाढीमिशा हालवीत तूं शिवशंकराला उपहासानें हंसला होतास; त्याचा अपमान केला होतास ! '

भृगुऋषीला जमिनीवर भिरकावून मग ते भगाकडे वळले. दक्ष-प्रजापति शंकराची निंदा करीत असतां याच भगानें डोळ्यांनीं खुणावून त्या शिवनिंदेला प्रोत्साहन दिलें होतें. त्याचें हें पाप नंदिकेश्वरानें गर्जून सांगतांच वीरभद्रानें एक ठोसा मारून भगाला जमिनीवर पाडलें आणि त्याचे डोळे काढून ते यज्ञांत टाकून दिले. हें भयंकर कृत्य पाहून सभेंत एकच कल्लोळ माजला. कोलाहल करीत असलेल्या स्त्रियांनीं आपले डोळे गच्च मिटून घेतले. दक्षानें शंकराला शाप दिला त्यावेळीं हा पूषा देव दांत काढून हंसत होता असें म्हणून नंदिकेश्वर त्याच्या अंगावर धांवून गेला. पण वीरभद्रानें नंदिकेश्वरापुढें उडी मारली. चंडीशानें पालथा पाडलेला पूषा देव तसाच पडला होता. त्याला डाव्या हातानें उभा करून वीरभद्रानें ठोसे मारून मारून त्यांचा प्रत्येक दांत पाडून टाकला. रक्तबंबाळ तोंड झालेल्या पूषाला तेथेंच फेंकून वीरभद्रानें पुन्हां दक्षावर झेप घातली. तोच त्यांचा मुख्य शत्रू होता.

दक्षयज्ञांतला ऋत्विज आणि इतर यज्ञदेवतांचा वीरभद्रानें सूड घेतला. पण सतीच्या देहत्यागाचा, शंकराच्या अपमानाचा सूड दक्षाचा वध केल्याशिवाय पुरा होत नव्हता. ‘ दक्षाचा वध कर ’ अशी शंकरानें वीरभद्राला आज्ञाच केली होती. म्हणून तो दक्षाच्या छातीवर उभा राहिला. आणि त्यानें पुन्हां एकदां गर्जना केली. ‘ हे देवहो हें माझें रौद्रकर्म तुम्ही पहा. ’ असें आव्हान देऊन वीरभद्रानें आपलें तीक्ष्ण खड्ग उचललें. दक्षाचा केशकलाप डाव्या हातानें ओढून उजव्या हातानें तो त्याचें शीर तोडूं लागला. पण वीरभद्राच्या तलवारीनेंहि दक्षाचें शिर तुटेना. दक्षाच्या स्वभावाप्रमाणेंच त्याची मान चिवट होती. तिच्यावर शस्त्र चालत नाहीं हें पाहून वीरभद्राला आश्चर्य वाटलें ! क्षणभात्र तो थबकला. पण आपला मार्ग निश्चित करायला त्याला वेळ लागला नाहीं.

वीरभद्रानें आपल्या हातांतील खड्ग दूर फेंकून दिलें. दंड पिटून तो म्हणला, 'या दक्षाचा वध त्याला शोभेल अशाच तऱ्हेनें केला पाहिजे. मी पशुपतीचा अंश आहे. पशुपतीच्या क्रोधांतून माझा जन्म आहे. आणि दक्ष हा पशूंचा आजन्म शत्रू आहे. यज्ञांत यानें अगणित पशू बळी दिले. गळा दाबून पशूला बुक्क्या मारून मारून ठार करायचें असा दक्ष-यज्ञांतला विधि आहे. म्हणून या यज्ञांत दक्षाचाहि मी तसाच विधिपूर्वक बळी देणार! दक्षाचा यज्ञीय पशूप्रमाणें बळी देणार' या घोषणेनें स्वर्गांतील देवांच्याहि अंगावर शहारे आले. पण वीर-भद्राकडे भृकुटी वांकडी करून पहाण्याची त्यांचीहि छाती नव्हती.

वीरभद्रानें दक्षाला उभें केलें. डाव्या हातानें त्याचा गळा दाबून



धरला आणि त्याला यज्ञीय पशूप्रमाणें, संज्ञपन विधीनें बुकलून बुकलून ठार केलें. दक्षाचा देह गतप्राण झाला. तेव्हां वीरभद्रानें पुन्हा खड्ग हातीं

घेतलें. आणि धडापासून त्याचें शिर वेगळें केलें. दक्षाचा आणि त्याच्या शरीराचा चिवटपणा संपला होता. रक्त गळत असलेलें तें दक्षाचें शिर वीरभद्रानें उचलले आणि मोठ्या आवेशानें गर्जना करीत तो यज्ञकुंडाकडे गेला. यज्ञाच्या धडधडत्या ज्वालांत त्यानें त्या शिराची आहुति दिली. स्त्रिया मुर्च्छित पडल्या. सर्व शिवगणांनीं शंकराचा आणि सतीचा जयजयकार केला. दक्ष-मस्तकाचें दक्षिणाग्नींत हवन करून वीरभद्रानें दक्ष-यज्ञांत पूर्णाहुति दिली. भूत, पिशाच गणांनीं आनंदानें नृत्य केलें. सूड पुरा झाला होता.

वीरभद्राचें कार्य संपलें. तो कैलासावर जाण्यास निघाला. हें भयंकर कृत्य आपण कोणासाठीं केलें? सती! त्या सतीचा देह इथेंच आहे. सर्व शिवगण गोंधळले, घुटमळले. त्यांचें नृत्य थांबलें; आनंद ओसरला. सतीचें दर्शन होतांच ते दुःखित झाले. सूड संपला आणि दुःख राहिलें. सतीला कैलासाला न्यावें का? पण तशी शंकराची आज्ञा नव्हती. सतीला आणा, असें भूतनाथानें सांगितलें नव्हतें. त्या सतीला मोठ्या आनंदानें आणि उत्साहानें येथें मिरवीत आणलें होतें. त्याच सतीचा निष्प्राण देह उदासपणें वाहून नेण्याचें दुःख आपल्याला कसें सहन होईल याची नंदिकेश्वराला शंका वाटूं लागली. सारे शिवगण शोकमग्न झाले. त्यांचे उद्घोष थांबले. वीरभद्र शांत झाला. तो नम्रपणें सतीसमोर गेला. त्यानें आपलें मस्तक नमवलें. सतीला प्रदक्षिणा घालून खालच्या मानेनें तो यज्ञमंडपांतून बाहेर पडला. नंदिकेश्वरानें, शिवगणांनीं सतीचें दर्शन घेतलें, तिला प्रदक्षिणा घातल्या आणि ते जड पावलांनीं कैलासाचा मार्ग चढूं लागले.

अनुक्रम २९०१९९
१३६८
नों. दि. 21/3/59

# शंकराची प्रार्थना

दक्ष-यज्ञाचा आणि दक्षाचा असा विध्वंस होणार हें नारदानें कैलासावरच ओळखलें होतें. आतां दक्षाला वांचविणें शक्य नाहीं हें त्याला दिसतच होतें. कारण घोररूप शंकराची इच्छा असेल तेंच होणार हें त्याला ठाऊक होतें. पण यांतूनहि मार्ग काढणें ब्रह्मदेवालाच शक्य होतें. म्हणून नारद कैलासावरून थेट सत्यलोकाला गेला. शिव-शंकरानें वीरभद्राला केलेली भीषण आज्ञा त्यानें ब्रह्मदेवाला सांगितली. ब्रह्मदेव म्हणाला, ' यज्ञाचा कर्ममार्ग संपला. दक्षाच्या दुष्टपणाला सर्व-नाशाचीं फळें आलीं. रुद्रानें आपलें संहारकार्य सुरू केलें आहे. '

' नाहीं. शंकर शांत आहे. फक्त त्याचा क्रोध, वीरभद्र विध्वंसाला निघाला आहे. ' नारदानें सांगितलें.

' शंकर शांत असेल तर अजूनहि विश्वाचें कल्याण होईल. ' ब्रह्म-देवाला आत्मविश्वास आला. तो दक्ष-यज्ञाला मुद्दामच गेला नव्हता. शंकराला हविर्भाग न देतां यज्ञ करण्याचा दक्षाचा हट्ट त्याला मान्य नव्हता. सोमरस पान करणारे देव दक्षाची इच्छा मानतात हें त्याला आवडत नव्हतें. दक्षाच्या मूढपणामुळें त्याच्या बृहस्पतीसदन यज्ञांत विघ्न येणार असें ब्रह्मदेवाला वाटतच होतें. उन्मत्तांना त्यांच्या दुष्क-र्मांचें प्रायश्चित्त मिळूं दे; आपण त्यांच्या दुष्कर्माला साक्षी होऊं नये म्हणून ब्रह्मदेव दक्ष-यज्ञाला गेलाच नव्हता. पण तो सृष्टीचा निर्माता होता. त्याला यज्ञविध्वंस व्हावा असें कसें वाटेल? म्हणून तो आतां यज्ञभूमीकडे निघाला. पण मार्गांतच त्याला देव भेटले.

त्या देवांनीं ब्रह्मदेवाला दक्ष-यज्ञाचें तें भयंकर वर्तमान कथन केलें. त्या देवगणांची स्थिति ब्रह्मदेवाला प्रत्यक्षच दिसत होती. आणि त्यापेक्षांहि त्यांच्या नजरेंतली भीति अधिक बोलकी होती. सतीचा

देहत्याग आणि दक्षाचा वध यांचें दृश्य त्याला दिसूं लागलें. दक्षाबरोबर यज्ञ संपला; तो मार्गच थांबला. आतां त्या यज्ञभूमीकडे तरी कशाला जयाचें? म्हणून देवगणांसह ब्रह्मदेव कैलासाकडे वळला. त्याच्या मागें दक्ष-यज्ञाचा विध्वंस पसरला होता आणि पुढें सतीच्या विरहानें पोळलेला शंकर त्याला दिसत होता. शंकराला प्रसन्न करणें कठीण आहे असें त्याला वाटत होतें. पण शंकर शांत आहे या नारदाच्या वचनावर विश्वासून तो चालला होता. शंकर शांत असेल तर क्षमायाचना करून त्याला प्रसन्न करतां येईल असें त्याला वाटत होतें.

ब्रह्मदेव आणि देवगण कैलास चढूं लागले. गंधर्व, किन्नर आणि अप्सरा यांचे थवे त्यांना दिसूं लागले. अनेक रंगांनीं शोभणारीं आणि रत्नांनीं चमकणारीं कैलासशिखरें त्यांच्यापुढें होतीं. मोठमोठ्या वृक्षांच्या छायेंत अनेक तऱ्हेचे पशु आणि त्यांच्या फांद्यांवर उडणारे नाना प्रकारचे पक्षी हें कैलास-वैभव त्यांना दिसूं लागलें. कैलासाला वेढून वाहणारी नंदा नदी त्यांनीं ओलांडली. याच नंदेमध्ये सती स्नान करीत असे. म्हणून नंदेचें पवित्र जल त्यांनीं डोळ्यांना लावलें. नंदा गेली, अलकनंदाहि ओलांडली. आतां कुबेराची ती रम्य अलकापुरी आली. यक्षांची ती राजधानीहि मागें टाकून ते सौगंधिक वनांत पोंचले. सौगंधिक कमलांकडे लक्ष द्यायला यावेळीं त्यांना वेळ नव्हता. ते शिव-दर्शनाला निघाले होते.

आणि अखेर त्यांना शिवाचें दर्शन झालें. शेंकडों योजनें उंच पसरलेल्या अशा वटवृक्षाखालीं तो महायोगी बसला होता. क्रोध जाळून त्याचें त्यानें भस्म लावलें होतें. त्यामुळें त्याची गंभीर मुद्रा अधिकच उदात्त दिसत होती. प्रातःकाळच्या मेघांप्रमाणें त्याचा वर्ण आरक्त दिसत होता. गजचर्मानें त्यानें शांति पांघरली होती; मस्तका-

वरच्या चंद्रांतून शीतलता स्रवत होती. दर्भाच्या आसनावर बसून तो अर्धवट मिटलेल्या नेत्रांनीं समोर बसलेल्या सिद्धांना आणि सत्पुरु-



षांना पहात होता. मृदु, गंभीर वाणीनें तो त्यांना योगमार्ग सांगत होता. त्याला पहातांच ब्रह्मदेवानें वंदन केलें. देवगणांनीं दंडवत घातलें.

देवगणांसह ब्रह्मदेव आलेला पहतांच श्रीशंकरांनीं उठून त्याचें स्वागत केलें. शंकराच्या मुखावर प्रसन्नता पसरली होती. आपल्या क्रोधानें दक्षयज्ञाचा विध्वंस करणारा हाच तो महारुद्र का? सतीच्या देहत्यागानें ज्यानें संतापून जटा आपटली तोच हा घोररूपी शंकर काय अशी ब्रह्मदेवाला शंका आली. पण आत्मानंदांत रममाण होणाऱ्या शिवाला तो ओळखत होता. शिवशंकर दयासागर आहे हें त्याला माहीत होतें. म्हणून त्यानें शंकराचें स्तुतिस्तोत्र सुरू केलें. तो म्हणाला, ‘शिवा, तूं परब्रह्म आहेस. हा विश्वाचा पसारा हा

तुझ्याच मायेचा खेळ आहे. तूं इच्छामात्रें हें निर्माण करतोस आणि प्रलयकालीं तें तुझ्याच ठिकाणीं विलीन करून टाकतोस. विश्वाच्या या पसाऱ्यांत ज्ञानमार्ग तूं प्रवर्तित केलास आणि यज्ञमार्गहि तुझाच आहे. दक्ष त्याच यज्ञमार्गानें जात होता. त्यानें अतिरेक केला. तुझा द्वेष सुरू केला. यज्ञांत त्यानें तुझा हविर्भाग बंद केला. त्याचें प्रायश्चित त्याला मिळालें. पण—'

शंकराच्या भोंवतीं शिवगण गोळा होत होते. त्यांचे चेहरे म्लान दिसत होते. याच शिवगणांनीं दक्ष-यज्ञाचा विध्वंस केला असेल हें कोणाला खरेंहि वाटलें नसतें. त्यांचें उग्र रूप लोपलें होतें. सतीमातेच्या वियोगाची शोकच्छाया त्यांच्या मुद्रेवर पसरली होती. त्यांच्यावर नजर फिरवीत ब्रह्मदेव पुढें बोलूं लागला, 'पण यज्ञमार्ग पुढें चालू व्हावा म्हणून तूं दयाळू होऊन दक्षाला पुन्हा जीवदान दे. यज्ञांतील अवशिष्ट भाग तुला प्राप्त होवो. यज्ञीय देवता, आणि ऋत्विज यांना तूं पुन्हां सजीव कर.' 'तथास्थु' शंकर शांतपणें म्हणाले. दक्षानें आणि देवांनीं, ऋत्विजांनीं आणि ऋषींनीं जो अन्याय केला त्याचा उच्चार मी करीत नाहीं. माझ्या क्रोधानें त्यांना शासन केलें आहे. तो वीरभद्र आतां शांत झाला आहे. वीरभद्रानें त्यावेळीं विश्वाचा संहार केला असतां. पण मी त्याला मंगळावर स्थान दिलें आहे. तो मंगल झाला आहे. माझा क्रोध मंगल झाला आणि वीरभद्र माझ्याच रूपांत आतां तुमच्यासमोर उभा आहे. दक्ष यज्ञ पुन्हां सुरू करण्याची तुझी इच्छा सफल होईल. वीरभद्रच तें कार्य करील.'

देवांना वीरभद्राबद्दल विश्वास वाटत नव्हता. ते शंकराला पुन्हां शरण आले त्यांनीं प्रार्थना केली. 'सदाशिवा, 'तूंच त्या दक्ष-यज्ञांत उपस्थित हो. तुझ्या साक्षीनेंच त्या यज्ञाचें मंगल होवो.' 'तथास्तु' असें म्हणून शिव-शंकर यज्ञभूमीकडे निघाले. वीरभद्रासह सारे

शिवगण त्यांच्यावरोबर चालूं लागले. ब्रह्मदेवामागून देवगण निघाले. यज्ञभूमीवर ते आले. क्षणापूर्वी स्मशानवत् भासणारी ती भूमी शंकराच्या स्पर्शानें मंगलमय झाली. यज्ञभूमीवर पसरलेलें विकाळ सूडकर्म ब्रह्मदेवानें शंकराला दाखविलें.

'हे भृगुऋषी. यांची दाढीमिशी उपटून यज्ञांत पडली आहे.'' ब्रह्मदेव म्हणाला.

" भृगूला यज्ञांत बळी जाणाऱ्या बोकडाची दाढी प्राप्त होईल." शंकरानें आशीर्वाद दिला.

" हा पूषा. याचे दांत पडले; भृगाच्या डोळ्यांची यज्ञांत आहुती पडली. अनेक देवगणांचे आणि ऋत्विजांचे हातपाय मोडले आहेत."


" यजमानाच्या दांतांनीं पिष्टमय झालेला हविर्भाग पूषाला मिळेल. भगाचे डोळे गेले तर यापुढें मित्राच्या डोळ्यांनीं तो पाहील. आणि ज्यांना तुम्ही सोमरस देत नाहीं त्या आश्विनीकुमारांच्या शक्तीनेच या देवगणांचे आणि ऋत्विजांचे अवयव पूर्ववत् होतील." शंकरांनीं दुसरा आशीर्वाद दिला.

" आणि हा दक्षप्रजापती येथें पडला आहे. त्याच्याशिवाय यज्ञ कसा सुरू होईल?"

" दक्षाला अजाचें शिर प्राप्त होवो! यज्ञांत बळी दिलेल्या बोकडांचें तें प्रतीक आहे. दक्षावर मी प्रसन्न झालों आहे. माझ्या मंदिरांत या दक्षाचें स्मरण करून बं बं असा ध्वनी करणाऱ्यांवरहि मी प्रसन्न होईन." शंकराचें हें वरदान ऐकतांच वीरभद्र पुढें आला. त्यानें एक अजाशिर उचललें आणि दक्षाच्या धडाला लावलें. दक्ष जिवंत झाला. यज्ञभूमीवर आनंद पसरला. दक्ष-यज्ञाचें पुनः संधान झालें. शंकरापुढें

दक्ष नम्र झाला. यज्ञांतील अवशिष्ट हविर्भाव त्यानें रुद्राला अर्पण केला. तें पहाण्यासाठीं यज्ञभोक्ता भगवान् विष्णूहि तेथें प्रकट झाला.

यज्ञांतील हविर्भाग शंकरानें ग्रहण केला. आणि त्याला सतीचें स्मरण झालें. शिवाचें चित्त विचलित झालें. त्याला समोर सतीचा देह दिसूं लागला. शिवाचा क्रोध शांत झाला होता. आतां त्याला शोध प्राप्त झाला. दक्ष यज्ञ संपला. दक्षाचा सूड संपला. पण सती गेली आणि शोक उरला. त्यानें शंकर वेडावून गेला.



# शिवाची भ्रमणयात्रा

भगवान् शंकराला सतीचें चरित्र आठवलें. तिचें अगाध प्रेम आठवलें. तिच्या निस्सीम त्यागाचें त्याला स्मरण झालें. आपल्यावरील प्रेमासाठींच सतीनें देहत्याग केला. आणि तिनें देहत्याग केला म्हणून हे देव, हा दक्ष-प्रजापति आपल्याला आज यज्ञांतील हविर्भाग देत आहे! हा विचार मनांत येतांच शंकर उठून उभे राहिले. यज्ञ-मंडपांतच सतीचा देह पडला होता. एक एक पाऊल ते सतीकडे जाऊं लागले.

सतीचा देह निश्चेष्ट पडला होता. पण तिच्या चेहऱ्यावरचें तेज ओसरलें नव्हतें; त्याच्यावरील निश्चयाची छटा ढळली नव्हती. "शिव-शंकराशीं एकरूप होण्यासाठीं मी देहत्याग करते." हे तिचे अखेरचे शब्द त्या वातावरणांत अजून घुमत होते. त्या क्षणीहि सतीनें आपलेंच ध्यान केलें असेल, आपलाच ध्यास घेतला असेल याबद्दल शंकराला शंका नव्हती. सतीच्या मुखावर शांत भाव ओसंडत होता. शांत चंद्रमा पाहून समुद्र उचंबळून यावा त्याप्रमाणें सतीचा मुखचंद्र पाहून शंकराचें हृदय उचंबळून आलें. "सती" "सती" अशा हांका मारीत ते धांवत तिच्याकडे गेले आणि त्यांनीं सतीला उचलून खांद्यावर टाकलें.

सारी सभा तटस्थ झाली. शिव-शंकर काय करीत आहेत याचा त्यांना बोध होईना. विरागी शंकराचें हें दर्शन त्यांना अगदींच नवें होतें. शिवाचें सतीवर अपार प्रेम आहे हें त्यांनीं ऐकलें होतें. शंकराचा दयार्द्र आणि उदार स्वभाव त्यांना ठाऊक होता. महाभयंकर उग्र असें रुद्राचें स्वरूप त्यांना माहीत होतें. तसेंच चिताभस्म शरीराला फांसणारें अतीव वैराग्य त्यांनीं पाहिलें होतें पण 'सती, सती' म्हणून टाहो फोडीत सतीचा निष्प्राण देह उचलणारे शिव-

•

शंकर पाहून त्यांना धक्का बसला. ते सारे सभाजन चित्राप्रमाणें तटस्थ झाले, दगडी पुतळ्याप्रमाणें ते अचल बसले.

आणि शिवशंकराला दुसरें कांहींच दिसत नव्हतें. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात होत्या. मस्तकावरचा चंद्रमा द्रवून ठिबकूं लागला. जटाजुटांमधून डोकावणारी गंगा लुप्त झाली. नागभूषणें वारंवार सैल होऊं लागलीं. एका हातांत त्रिशूल होता. दुसरा हात खांद्यावरील सतीचा देह सांवरीत होता. रुद्ध कंठांतून एकच ध्वनी निघत होता. सती, सती ! शोकावेगांत शंकराचें एक पाऊल उचललें, दुसरें उचललें. हें नृत्य नव्हतें. त्यांत आवेश होता. पण तो शोकाचा. त्यांत हेतु नव्हता. तें एक सतीचें ध्यान होतें तें ध्यान करीत शंकर निघाले. आपण कुठें जात आहोंत तें त्यांनाहि ठाऊक नव्हतें. त्यांच्या मुखांतून एकच ध्वनी निघत होता. सती ! आणि त्याच ध्वनीच्या मागून ते जात होते.

शंकर निघाले आणि त्यांच्या मागून शिव-गण चालूं लागले. आपण कुठें जात आहोंत हें त्यांनाहि कळत नव्हतें. शिवाचीं पावलें उठत होतीं त्यांच्या मागून ते जात होते. शंकराला थांबविण्याची त्यांना शक्ति नव्हती. तशी शक्तीच विश्वांत नव्हती. आणि शिवगण तरी शोकाकुलच झाले होते. शिवाचें सतीवरचें प्रेम त्यांना ठाऊक होतें. ते वेडे झाले होते. यज्ञमंडप, त्यांतले देव, ऋषि, सभाजन तेथेंच तटस्थ राहिले. सतीच्या नांवाचा जप करीत शंकर पुढें जात होते. त्यांच्या मागून सांवलीप्रमाणें फक्त एक भगवान् विष्णु जात होते.

शंकर निघाले. भारतांतील नाना प्रदेशांत त्यांनीं भ्रमण केलें. डोंगर दऱ्या पालथ्या घातल्या. पर्वत शिखरें चढले, उतरले. नद्यांचे उगम त्यांच्या पायांखालून गेले. सरिता-संगमांना त्यांचा पदस्पर्श झाला वनें, उपवनें सतीच्या नामघोषानें भरून गेलीं. कन्या-कुमारीपासून हिमालयापर्यंत शिवशंकराच्या पदमुद्रा उमटल्या. शिव सतीच्या अद्भुत

प्रमानें तें दृश्य भारत भूमीवरच्या कणाकणानें पाहिलें. शिलाखंडांनाहि अश्रु आले ! आकाशांतल्या तारांना तो शोक पहावेना. त्यांनीं आपले



दिव्य देह सतीच्या पायांवर झुगारून दिले. उल्कापात झाले. पण शंकराचें कशाकडेच लक्ष नव्हतें. उभ्या भारताची एक यात्रा संपली. दुसरी सुरू झाली. तिसरी सुरू झाली. शिवशंकराची भ्रमंति

वाऱ्याच्या गतीनें शिवाची यात्रा चालू होती. समुद्राच्या किनाऱ्यावर उमटणाऱ्या लाटांच्या ध्वनीप्रमाणें सतीचा नामघोष अखंड चालू होता. शिवाची ही यात्रा संपणार कशी ? थांबणार कुठें ? हें कोणींच सांगू शकत नव्हता. सारे त्या यात्रेंत देहभाव विसरले होते. साऱ्यांना शोकानें ग्रासलें होतें. शिवशंकरामागून सांवलीप्रमाणें जाणारा भगवान् विष्णूहि असाच शोकमग्न झाला होता. पण तीन प्रदक्षिणा झाल्या

आणि तो भानावर आला. 'रुद्र संहारकर्ता आहे. मी रक्षणकर्ता आहें. पण शोकाकुल शंकर संहार तरी कसा करील? म्हणून या विश्वाचें प्रथम शोकापासून रक्षण केलें पाहिजे,' विष्णूनें असा विचार केला. पण शिवाची ही यात्रा थांबणार कशी! विष्णूनें नेत्र मिटले आणि आपलें धनुष्य उचललें. सतीच्या देहावर तो बाण सोडूं लागला.

भगवान् विष्णूच्या बाणांनीं सतीचा देह विद्ध होऊं लागला. तिचा एक एक अवयव गळून पडूं लागला. तो अवयव भूमीवर पडला. म्हणजे कापराप्रमाणें विरून जाई. पण शिवशंकराच्या तें लक्षांतहि आलें नाहीं. सतीचा जप करीत त्याचीं पावलें पडत होतीं. आपल्या खांद्यावरचा सतीचा देह कधीं खालीं पडला हें त्याला समजलें नाहीं. शंकर कैलासावर आले. तेव्हां भगवान् विष्णूनें पुकारा केला, 'शिव-शंकरा, सती कुठें आहे?'

'सती, सती,' शंकर थबकले. 'सती कुठें आहे?' सतीचा देह आपल्या खांद्यावर नाहीं हें पहातांच ते थांबले. त्यांनीं नेत्र मिटले आणि ज्ञानदृष्टीनें ते पाहूं लागले. 'सती शिवामध्यें एकरूप झाली' त्यांनीं नेत्र उघडून गंभीर वाणीनें विष्णूला उत्तर दिलें.

अनंतांत विलीन झाला होता. सतीचा देह


'आणि सतीचा देह भारतांत सर्वत्र पसरला आहे. एकशें आठ क्षेत्रांत तिच्या अवयवांनीं पवित्र स्थानें निर्माण केलीं आहेत. देवीचीं तीं अष्टोत्तर शतपीठें तुझ्या पदमुद्रांनींहि पावन झालीं आहेत. आणि त्या अष्टोत्तर शतपीठांमध्यें तूंहि अंशमात्रानें वास करीत आहेस.' भगवान् विष्णु म्हणाले.

'आणि तीच सती माझ्या चित्तांतील ब्रह्मकला आहे. शंकर असें म्हणाले आणि कैलास शिखरावर ध्यानस्थ बसले. शोक संपला आणि शांति आली. समाधि लागली.

अनुक्रम २८१०५... विभाग ... क्रमांक ९३६८ दि. ३१।३।६९

# शिव-समाधि


शिवशंकराची समाधि लागली. अर्धे मिटलेले, अर्धे उघडलेले असे त्यांचे नेत्र आपल्या चित्तांत सतीचें, ब्रह्मकलेचें दर्शन घेत होते. त्या ब्रह्मकलेच्या दर्शनानें ओसंडणारी प्रसन्नता शंकराच्या मुखावरून कैलासावर पसरली. शोक नाहींसा झाला; समाधान पसरलें. सुगंधित वायु वाहूं लागला. सूर्यकिरण शीतल झाले. चांदणें मधुर झालें. शिवगणांना हर्ष झाला आणि ते डोलूं लागले. कैलासांत सौंदर्य मोहरलें आणि तो वैभवानें फुलला.



भगवान् विष्णूनें शिवाचें दर्शन घेतलें. अवघ्या विश्वाला पावित्र्य आलें होतें. शंकराच्या शक्तीनें विश्वाची घडामोड होते. सर्वत्र कल्लोळ माजतो त्यावेळीं शिव शांत असतो. जग हादरतें त्यावेळीं तो त्याला आधार देतो. विश्व जळूं लागतें त्यावेळीं तो विषाचा घोंट घेतो.

अशी ही परब्रह्म मूर्ति होती. विश्वाच्या वैभवासाठीं समुद्रमंथन झालें. वसुंधरेला नटविण्यासाठीं सागर घुसळून रत्नें काढण्यांत आलीं. पण अमृत निघण्यापूर्वीं विष आलें. त्रैलोक्याला जाळूं पहाणारें तें हलाहल फक्त शंकरानेंच कंठांत धारण केलें. अमंगलाचें भस्म करून मंगल करणारा हा शिवशंकर. देवांवर पुन्हां संकट येईल त्यावेळीं याचीच प्रार्थना करावी लागणार. भगवान् विष्णूला पुढचें शिवचरित्र दिसूं लागलें.

सती हिमालयाची कन्या होणार; पर्वतकन्या पार्वती उग्रतपानें उमा होऊन शंकराला वरणार आणि त्या वेळीं ती माझी भगिनी मी शिवाला अर्पण करीन. पुराणपुरुष शंकराला आदिमाया गौरी प्राप्त होईल. भगवान् विष्णूला हें पुढचें सती–चरित्र दिसूं लागलें. भगवान् अंतर्धान पावले. शिव-शंकराची कैलासावर समाधि लागली होती. ते ब्रह्मकलेशीं रममाण झाले होते. शिवशक्तीशीं एकरूप होते.





ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक
वाचनालय शाखा.

मुंबईत गृहिणींची उत्तम सोय !

शुद्ध, स्वादिष्ट व रुचकर

# ❀ कुबल मसाले ❀

का र खा न दा र

**के. टी. कुबल आणि कंपनी प्रा. लि.**

रजिस्टर्ड ऑफिस

४०, फोरास रोड मुंबई नं. ८

टेलिफोन नं. ४११७९

—शाखा—

लालबाग, परेल, नायगांव, दादर, ताडदेव, गोलपिठा,

लालबाग मार्केट, वरळी मार्केट व सातरस्ता.

योग्य भावांत उत्कृष्ट माल

सुवर्ण पदक मिळविलेले

# टी. एच्. कटारिया

चष्म्यांचे आदर्श विक्रेते

१७२, हॉर्नबी रोड, मुंबई १.


रावळगांव
टॉफीचा नवा, सुंदर, रंगीत डबा...
आतां रावळगांव टॉफीचा आणखी एक नवा, रंगीत व सुंदर कबुतरांचे चित्र असलेला डबा मिळू लागला आहे. भेट देण्यास तर हा डबा फारच छान असून प्रत्येकाला परवडेल अशा किंमतीत तो मिळतो.
Ravalgaon
WALCHAND GROUP INDUSTRY
सेलिंग एजन्टस: मे. मोतीलाल गिरधारीलाल आघारकर, मालेगांव, जि. नाशिक.
pratibha-60-1

# इंडो-जर्मन रीव्ह्यू

भारत आणि जर्मनी यांचे स्नेहसंबंध

दृढ करण्याच्या ध्येयानें

प्रसिद्ध होत असलेलें मासिक

दर अंकाची किंमत १ रुपया

वार्षिक वर्गणी १२ रुपये

**१६ युसुफ बिल्डिंग, वीर नरीमन रोड, मुंबई १.**

तारेचा पत्ता–GRUSSGOTT ★ टेलिफोन नंबर–२५११९८६


त्याचे स्वप्न
साकार व्हावे म्हणून…
हा तरुण मुलगा भारताच्या स्वप्नांचे
प्रतीक आहे. तो अध्ययन व परिश्रम करण्यास अतिशय
उत्सुक आहे. त्यामुळे तो राष्ट्रीय पुनर्रचनेच्या
कार्यात सक्रीय भाग घेऊ शकतो. त्याचे आईवडिल
सूज्ञ आहेत. आपल्या मुलाचे स्वप्न साकार व्हावे म्हणून
त्यांनी अल्प बचत योजनेत रक्कम गुंतविली आहे.
अल्प बचत योजनेंत
रक्कम गुंतवा
तपशीलवार माहितीसाठी लिहा:-
उपसंचालक, अल्प बचत योजना बृहन्मुंबई, सचिवालय, मुंबई.
जिल्ह्याच्या ठिकाणांसाठी कलेक्टर
तालुक्याच्या ठिकाणांसाठी मामलतदार/महालकरी.
प्रकाशन संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई

# मंगलमूर्ति श्री गणेश




लेखक

पु. रा. बेहेरे


'पुस्तक वाचतांना मीं अगदीं रंगून गेलों. हें पुस्तक लिहून तुम्ही सांस्कृतिकदृष्टचा लक्षांत घेण्याजोगी कामगिरी केली आहे.'

किंमत रु. २·१०


बलवंत पुस्तक भांडार

गिरगांव नाका, मुंबई ४

# अठरा महापुराणें

## संपादक : काशिनाथ अनंत जोशी

अठरा महापुराणें मराठींत प्रसिद्ध करण्याची योजना आम्हीं हातीं घेतली आहे. त्यांपैकीं **विष्णुपुराण, मार्कंडेयपुराण** आणि **शिवपुराण** प्रसिद्ध झालींच आहेत. **भागवतपुराण, ब्रह्मपुराण** व **मत्स्यपुराण** प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत. राहिलेलीं पुराणें प्रसिद्ध होत आहेत.

* प्रत्येक पुराण मूळ संस्कृतमधून मराठींत केलें आहे.
* पुराण तयार करतांना मूळ संस्कृतांतील कोणताहि भाग न गाळतां तें तयार करण्याची कटाक्षानें दक्षता घेतलेली आहे.
* अठरा पुराणांची किंमत अदमासें दोनशें रुपये राहील. आधीं पैसे पाठविणारास हीं सर्व पुराणें सव्वाशें रुपयांत घरपोंच मिळतील.
* हीं सर्व अठरा महापुराणें तीन वर्षांत प्रसिद्ध होतील असा अंदाज आहे.

★

धार्मिक प्रकाशन संस्था
निबकर आणि मंडळी, माधवबाग, मुंबई ४.

IRBK-0108990